# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१८

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**मुंबईतील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत म्हाडाला पुनर्वसन गाळे म्हणून मिळणारी घरे अद्याप म्हाडाकडे हस्तांतरीत करण्यात आली नसल्याबाबत**

**(१) ९६५ (२३-१२-२०१४). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत म्हाडाला पुनर्वसन गाळे म्हणून मिळणारी ३००० घरे अद्याप झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने म्हाडाकडे हस्तांतरीत केली नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त घरे म्हाडाकडे तातडीने हस्तांतरीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (११-१०-२०१८) :** (१) हे खरे नसल्याचा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचा अहवाल आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात कमाल नागरी जमीन धारण कायदा (यूएलसी) जमिनीच्या वापरात गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(२) ७३९६३ (२०-०४-२०१७). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात युएलसी कायदा रद्द झाल्यानंतर, मुंबई, नागपूर, पुणे, ठाणे, नाशिक, कोल्हापूर, सांगली सह इतर महापालिकांच्या हद्दीतील सदरहू कायदयातील कलम ३४ नुसार मोठया

प्रमाणात अतिरिक्त ठरलेल्या म्हाडा आणि संबंधित महापालिकांकडे प्रत्यक्षात किती जमिनी उपलब्ध आहेत आणि या जमिनीवर आर्थिक दुर्बल घटकांसाठी किती घरे बांधण्यात आली याची संपूर्ण महिती नगरविकास खात्याकडे उपलब्ध नसल्याची बाब माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे यूएलसी जमिनीच्या वापरात गैरव्यवहार झाल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदरील युएलसी जमिनी प्रकरणी गैरव्यवहार झाला असल्यास दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-१०-२०१८) :** (१) व (२) नाजकधा अधिनियमातील कलम १०(३) १०(५) अन्वये संपादित करण्यात आलेल्या आणि कलम २० अन्वये गृहबांधणी, विशेष भूखंड विकास योजना, कृषी व औद्योगिक प्रयोजनार्थ संपादनापासून सुट देण्यात आलेल्या जमिनींना नाजकधा (निरसन) अधिनियम १९९९ अन्वये संरक्षण देण्यात आले आहे. राज्य शासनाने निरसन अधिनियम १९९९ हा दि.२९.११.२००७ पासून स्विकृत केला आहे.

नाजकधा अधिनियम, १९७६ च्या कलम १०(३) १०(५) नुसार ताब्यात घेण्यात आलेले क्षेत्र तसेच कलम २० खालील योजनेमधून शासनास प्राप्त झालेले शासनदेय क्षेत्र हे दि.०४.०५.२०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण (म्हाडा) यांच्या अधिपत्याखालील विभागीय गृहनिर्माण मंडळास गृहनिर्माण योजना राबविण्यासाठी देण्याच्या सुचना देण्यात आल्या आहेत. उक्त सुचनांच्या पार्श्वभुमीवर नागरी समुह कार्यालयाकडील मिळकतीचे क्षेत्रफळ इत्यादी बाबी विचारात घेऊन म्हाडा व नागरी समुह कार्यालयाच्या समन्वयाने कार्यवाही अपेक्षित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई शहरात झोपडपट्टी पूनर्वसन योजना तात्काळ सादर न केल्यास भूखंड ताब्यात घेण्याचा घेतलेला निर्णय

**(३) ७४१४१ (२०-०४-२०१७). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.संजय सावकारे (भुसावळ), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग**

**अळवणी (विलेपार्ले), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत खाजगी भूखंडावर मोठ्या प्रमाणात झोपड्या असून या भूखंड धारकांनी तात्काळ झोपू योजना सदर न केल्यास त्याचे भूखंड ताब्यात घेण्याची कारवाई करु अशी घोषणा मा.मुख्यमंत्री महोदयांनी दोन वर्षपूर्वी केल्याची बाब दिनांक ०३ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घोषणेनुसार आतापर्यंत किती भूखंडधारकांनी झोपडपट्टी पुनर्वसन योजना सादर केली आहे,

(३) असल्यास, या भूखंडधारकांकडून भूखंड ताब्यात घेण्यात आले आहेत काय,

(४) असल्यास, सदर भूखंड ताब्यात घेण्यास विलंब करणा-या संबधित अधिकाऱ्यांवर व भूखंडधारकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (०२-०८-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांनी प्रलंबित योजनाचा व्यापक आढावा घेतला असून महाराष्ट्र झोपडपट्टी (सु.नि. व पु.) अधिनियम, १९७१ चे कलम १३(२) अन्वये एकूण १२२ झोपडपट्टी पुनर्वसन योजनांच्या विकासकांना नोटीसा बजावण्यात येऊन त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देण्यात आली असल्याचा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचा अहवाल आहे.

(२) हे खरे नाही. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या १३ व्या बैठकीतील ठरावानुसार जून २०१५ मध्ये खाजगी ट्रस्ट व धर्मादाय संस्था यांच्या मालकीच्या जमिनीवरील झोपडपट्टी क्षेत्राचा विकास करण्याकरीता नोटीसा देण्यात आल्या होत्या. ऑक्टोबर २०१५ मध्ये वृत्तपत्रात जाहीर नोटीसही प्रसिध्द करण्यात आली. त्यानंतर सुमारे ४०७ एकर झोपडपट्टी पुनर्वसन योजना न दाखल झालेले क्षेत्र संपादनासाठी निश्चित करण्यात आला असून सुमारे १४२ एकर क्षेत्र संपादनाची कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे.

(३) दिनांक ३१ जानेवारी २०१७ पर्यंत महाराष्ट्र झोपडपट्टी (सु.नि.व पु.) अधिनियम, १९७१ चे कलम १३(२) अन्वये झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प रखडविणाऱ्या एकूण ५४ विकासकांच्या नियुक्त्या रद्द करण्यात आल्या आहेत.

(४) १२२ पैकी ३८ विकासकांनी त्यांचे खुलासे सादर केलेले आहेत. कारवाई करण्यात येऊन योजनेतील नियुक्ती रद्द करण्यात आलेले विकासक व संबंधित सहकारी गृहनिर्माण संस्था पुढीलप्रमाणे आहेत. :-

| अ.क्र. | संस्था | विकासक |
|---|---|---|
| १ | अष्टविनायक एसआरए स.गृ.सं. | -- एस.एस.व्ही. रिअलटर्स |
| २ | जनता एसआरए स.गृ.सं | -- मे.एस.के. कॉर्पोरेशन |

| | | |
|---|---|---|
| ३ | संजीवनी एसआरए स.गृ.सं | -- मे.वैभव लक्ष्मी बिल्डर्स ॲन्ड डेव्हलपर्स. |
| ४ | न्यू साफल्य एसआरए स.गृ.सं | -- मे.अमीकृपा लॅन्ड डेव्हलपर्स |
| ५ | गणेश नगर एसआरए स.गृ.सं | -- मे.धनश्री डेव्हलपर्स |
| ६ | जयहिंद गांधीनगर एसआरए स.गृ.सं | -- मे. हरी ओम डेव्हलपर्स/ मे.विजय कमल प्रॉपर्टीज प्रा.लि. |
| ७ | श्री.गणेशनिवास एसआरए स.गृ.सं. | -- मे. ड्रिम डेव्हलपर्स |
| ८ | संजीवनी व इतर एसआरए स.गृ.सं. | -- मे.एस.एस.व्ही डेव्हलपर्स |
| ९ | गणेशनगर एसआरए स.गृ.सं. | -- मे. साईसिध्दी डेव्हलपर्स |
| १० | श्री.अष्टविनायक एसआरए स.गृ.सं | -- मे.गॅलक्सी इंटरप्रायजेस |
| ११ | वक्रतुंड एसआरए स.गृ.सं | -- मे.आयडीएल बिल्डर्स ॲन्ड डेव्हलपर्स |
| १२ | समता एसआरए स.गृ.सं. | -- वैधही आकाश हौसिंग प्रा.लि. |
| १३ | अण्णा- कासमनगर सह.गृ.संस्था | -- मे. के.एस.चमणकर एंटरप्राईजेस |
| १४ | साईधाम एसआरए स.गृ.सं | -- मे. एस.एस.व्ही. डेव्हलपर्स |
| १५ | डिवाईन मशी स.गृ.सं | -- कुंजन मेहता बिल्डर्स ॲन्ड डेव्हलपर्स |
| १६ | गणेशवाडी एसआरए स.गृ.सं | -- मे.अंकीता बिल्डर्स ॲन्ड डेव्हलपर्स |
| १७ | हनुमान नगर एसआरए स.गृ.सं | -- मे.कांची बिल्डर्स ॲन्ड डेव्हलपर्स |
| १८ | शिवाजी नगर एसआरए स.गृ.सं | -- मे.विनायक रिअल्टर्स |
| १९ | श्री.सिध्दीविनायक सह.गृह.संस्था | -- यश बिल्डर्स ॲन्ड डेव्हलपर्स |
| २० | भाई बंदरकर फिशरमेन्स सह.गृह.संस्था | -- मे. मॅझसन बिल्डर्स डेव्हलपर्स |
| २१ | मौर्या एसआरए सह.गृह.संस्था | -- मे.म्हात्रे आणि असोसिएटस् |
| २२ | समता सह.गृह.संस्था | -- मे.डिसन्स इन्व्हेस्टमेंट ॲन्ड फायनान्स प्रा.लि. |
| २३ | अमनएकता सह.गृह.संस्था | -- मे.डिसन्स इन्व्हेस्टमेंट ॲन्ड फायनान्स प्रा.लि |
| २४ | मोतीलाल सह.गृह.संस्था | -- पंक्ती हाऊ. प्रा.लि. |
| २५ | एकविरा विहार सह.गृह.संस्था | -- मे. राम चंद्रा जी पाटील |
| २६ | शिवनेरी सह.गृह.संस्था | -- मे.सृष्टी असोशिएटस् बिल्डर्स ॲन्ड डेव्हलपर्स |
| २७ | रामनारायण शिवनंदन सह. गृह.संस्था | -- मे.उमाइया डेव्हलपर्स |
| २८ | आउट पोस्ट एसआरए सह.गृह.संस्था | -- मे. पिरॅमिड डेव्हलपर्स |
| २९ | रामबाग हनुमान नगर सह.गृह.संस्था | -- युनायटेड मॅक्स कंन्स्ट्रक्शन लि. |
| ३० | पारस उपाध्याय सह.गृह.संस्था | -- मे.राज रीयल्टर्स |
| ३१ | श्रमजीवी (एसआरए) सह.गृह.संस्था | -- मे.सृष्टीराज इंटरप्राईजेस |
| ३२ | किशोर किरण सह.गृह.संस्था | -- मे.स्कायलार्क बिल्डकॉर्न प्रा.लि. |
| ३३ | हरी ओम सह.गृह.संस्था | -- अमिकृपा लॅन्ड डेव्हलपर्स |

| | | |
|---|---|---|
| ३४ | गणेश नगर सीएचएस | -- मे.लकडावाला डेव्हलपर्स |
| ३५ | बी.सी.ॲन्ड ओ (पार्ट)ब्लॉक, व्ही.पी नगर सीएचएस | -- मे.मिहिरठक्कर ॲन्डअसोसिएटस् |
| ३६ | जय भवानी व इतर १४ सह.गृह.संस्था | -- मे.जी.एम.एस. वास्तु आणि बिल्डर्स प्रा.लि. |
| ३७ | फ्लायओव्हर सह.गृह.संस्था | -- मे. लकी डेव्हलपर्स |
| ३८ | न्यू नवरत्न वक्रतुंड सह.गृह.संस्था | -- मे.माऊली साई डेव्हलपर्स प्रा.लि. |
| ३९ | श्री.साईकृपा सह.गृह.संस्था | -- मे.परेश वालीया ॲन्ड डेव्हलपर्स |
| ४० | आदर्श सह.गृह.संस्था | -- मे.कुणाल बिल्डर्स ॲन्ड डेव्हलपर्स |
| ४१ | जनता कल्याणकारी सह.गृह.संस्था | -- मे.सिध्दार्थ बिल्डर्स ॲन्ड डेव्हलपर्स |
| ४२ | नवशक्तीनगर सह.गृह.संस्था | -- मे.बीजेय रिअल्टर्स प्रा.लि. |
| ४३ | साहिल सह.गृह.संस्था | -- मे.फ्रिस्कॉन इन्फ्रास्ट्रक्चर |
| ४४ | चैतन्य सह.गृह.संस्था | -- मे.एन.एस.टी रिअल्टर्स प्रा.लि |
| ४५ | न्यू शांतिसेवा सह.गृह.संस्था | -- मे.सिध्दार्थ बिल्डर्स ॲन्ड डेव्हलपर्स |
| ४६ | ग्रीन नशेमन सह.गृह.संस्था | -- मे.पोलस्टार इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. |
| ४७ | सन रे सह.गृह.संस्था | -- मे.मिडास डेव्हलपर्स प्रा.लि. |
| ४८ | आनंद नगर सह.गृह.संस्था | -- मे.अभिनी डेव्हलपर्स |
| ४९ | शुध्दोधन सह.गृह.संस्था | -- मे.ॲमिस्थिट कन्स्ट्रक्शन आणि इन्फ्रास्ट्रक्चर कं. |
| ५० | श्री.सम्राट एसआरए सह. गृह. संस्था | -- मे.ॲमिस्थिट कन्स्ट्रक्शन आणि इन्फ्रास्ट्रक्चर कं. |
| ५१ | एकता एसआरए सह.गृह. संस्था | -- मे.फॅटकॅट इन्फ्रा प्रा.लि. |
| ५२ | शिव शंकर (एसआरए) सह.गृह. संस्था | -- मे.अनिकेत बिल्डर्स ॲन्ड डेव्हलपर्स |
| ५३ | न्यू महर्षि (एसआरए)सह.गृह. संस्था | -- मन्थन बिल्डर्स ॲन्ड डेव्हलपर्स |
| ५४ | मुकुंद नगर (एसआरए)सह.गृह. संस्था | -- मे.पॅटागॉन प्रमो प्रा.लि. |

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबईतील प्रकल्पग्रस्तांसाठी झोपडपट्टी पुनर्विकासातून बांधण्यात येणारी घरे महानगरपालिकेला देण्याबाबत**

**(४) ७४३०१ (२०-०४-२०१७). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या रस्ते रुंदीकरण, ब्रिमस्टोवॅड, नाले आणि जलवाहिन्यांच्या दुरुस्ती कामामुळे विस्थापपित झालेल्या प्रकल्पग्रस्तांसाठी झोपडपट्टी पुनर्विकासातून बांधण्यात येणा-या घरांमधील १००० घरे महानगरपालिकेला देण्याचा निर्णय झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरणाने माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयानुसार आतापर्यंत किती घरांचे हस्तांतरण महानगरपालिकेस केले आहे वा त्यानुषंगाने सुरु असलेल्या कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (०३-०८-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) अद्याप पर्यंत एकूण ७६ सदनिकांचे बृहन्मुंबई महानगरपालिकेस हस्तांतरण करण्यात आले आहे. उर्वरित सदनिका महानगरपालिकेस हस्तांतरीत करण्याकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेने दि.२५.०१.२०१८ रोजी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांना कळविले आहे.
महापालिकेस उपलब्ध असलेल्या एकूण ७६ सदनिका प्रकल्प धारकांना वितरीत करण्याकरीता उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत असा बृहन्मुंबई महानगरपालिकेचा अहवाल आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पनवेल येथील खांदा (जि.रायगड) वसाहतीत बांधण्यात आलेल्या हॉकर्स झोनमधील टप-या विनावापर पडून असल्याबाबत**

**(५) ७४९८० (२०-०४-२०१७). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पनवेल येथील खांदा (जि. रायगड) वसाहतीत बांधण्यात आलेल्या हॉकर्स झोनमधील टप-या विनावापर पडून असून त्या टप-यामध्ये फेरीवाल्यांचे पुनर्वसन करण्याची मागणी तेथील रहिवाश्यांनी महापालिका व सिडकोकडे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या मागणीनुसार शासनाने कोणता निर्णय घेतला आहे व त्याचे स्वरुप काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-१०-२०१८) :** (१) हॉकर्स झोनमधील विनावापर पडून असलेल्या टपऱ्यांमध्ये फेरीवाल्यांचे पुनर्वसन करण्याची मागणी तेथील रहिवाश्यांनी पनवेल महानगरपालिकेकडे केलेली आहे. तथापि, सिडकोच्या वसाहत विभागाकडे या विषयाशी संबंधित अर्ज प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.
(२) पनवेल विभागात सिडकोमार्फत नवीन वसाहत निर्माण करण्यात येत असून त्या ठिकाणी सर्व सुख सुविधांसह वसाहती, बाजार, शाळा, दैनिक बाजार इ. विकसित करण्यात आले आहेत. दि.१४.१०.२०१६ रोजी पनवेल महानगरपालिका अस्तित्वात आल्याने सिडकोने विकसित केलेला पनवेल विभाग महानगरपालिकेच्या हद्दीत समाविष्ट करण्यात आला आहे. पनवेल महानगरपालिका परिक्षेत्रातील वाटप करण्यात आलेल्या जागा व वाटपाकरिता असलेल्या जागा पनवेल महानगरपालिकेस हस्तांतरित करण्याचा प्रस्ताव सिडको संचालक मंडळाने

दि.१२.०१.२०१७ रोजी मंजूर केला आहे. सद्यस्थितीत सामाजिक सुविधांचे भूखंड हस्तांतरणाची प्रक्रीया सुरु असून भूखंड हस्तांतरणानंतर दैनिक बाजार वाटपाबाबतचे प्राधिकार पनवेल महानगरपालिकेकडे राहणार आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**एसआरएच्या घरांची खरेदी करणाऱ्यांवर तसेच संक्रमण शिबीरात घुसखोरी करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत**

**(६) ७६५८७ (२१-०४-२०१७). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एसआरए (झोपडपट्टी निमुर्लन) प्रकल्पामध्ये मोफत मिळालेली सदनिका दहा वर्षांपर्यत विकता येत नसतानाही ती खरेदी करणाऱ्यांवर तसेच म्हाडाच्या संक्रमण शिबीरात घुसखोरी करण्याऱ्यांवर कारवाई करण्याचे आदेश मा.न्यायालयाने शासनास माहे जानेवारी, २०१७ च्या दुसऱ्या आठवड्यात दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तद्‌नुसार एसआरएच्या घरांची खरेदी करणाऱ्यांवर तसेच संक्रमण शिबीरात घुसखोरी करणाऱ्यांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (०३-०८-२०१८) :** (१) होय. हे खरे आहे.
(२) मा.उच्च न्यायालयाच्या दि.०५.०८.२०१५ च्या निदेशानुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने विविध योजनांमार्फत २०१५ पर्यंत पूर्ण केलेल्या व वाटप केलेल्या गाळयांचे सर्वेक्षण केले.

सक्षम प्राधिकाऱ्यांकडून अशा सदनिकाधारकांनी कलम ३ ई चा भंग करुन व्यवहार केला आहे किंवा कसे, याची सुनावणीद्वारे पडताळणी करुन कार्यवाही केली जात आहे.
तसेच, संक्रमण शिबीरातील घुसखोरांची खालीलप्रमाणे ३ संवर्ग तयार करण्यात आले आहेत:-

अ) मूळ रहिवाशी ज्यांना संक्रमण शिबीरामध्ये स्थानांतरण करण्यात आले.

ब) अशा प्रकारचे रहिवाशी ज्यांनी Power of attorney किंवा तत्सम प्राधिकार पत्राद्वारे मूळ रहिवाशांकडून संक्रमण शिबीरातील गाळयांचा हक्क घेतला आहे.

क) अशा प्रकारचे घुसखोर रहिवाशी ज्यांनी म्हाडाच्या संक्रमण शिबीरातील गाळयांचा ताबा घेतला आहे इ.

वरील प्रमाणे ३ वर्गवारीतील घुसखोरांना नियमित करावे वा सामावून घेण्यात यावे किंवा कसे, याबाबतचे धोरण सध्या शासनाच्या विचाराधिन आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अंधेरी (पूर्व) येथील हबटाऊन सोलारिस या व्यावसायिक इमारतीतील क्षेत्रफळाचे झालेले उल्लंघन व अनधिकृत बांधकामावर कारवाई करण्याबाबत**

**(७) ८४२९५ (२१-०४-२०१७). श्री.रमेश लटके (अंधेरी पूर्व) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंधेरी (पूर्व) येथील हबटाऊन सोलारिस या व्यावसायिक इमारतीत elevation projection A.H.U ., service area, refuge area इत्यादी वापराकरिता F.S.I. मध्ये सूट असलेल्या क्षेत्रफळाचा प्रत्यक्ष चटई क्षेत्रात अनधिकृतरित्या समाविष्ट केल्यामुळे १ लाख चौरस फुट क्षेत्रफळाचे उल्लंघन झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर इमारतीची बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या के/पू विभागाने पाहणी करून मोठ्या प्रमाणावर अनधिकृत बांधकाम करून क्षेत्रफळाचे उल्लंघन झाले असल्याचे कार्यकारी अभियंता, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांना कळविले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मुख्य कार्यकारी अभियंता, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यास पत्र पाठवून त्वरित कारवाई करण्याची मागणी केली होती व त्या कारवाईकडे आजपर्यंत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने दुर्लक्ष केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, क्षेत्रफळाचे उल्लंघन झाले असल्याचे निदर्शनास आल्यानंतरही १०,११,१२ व १३ या मजल्याचे वाढीव बांधकाम करण्यास झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने कोणत्या आधारे परवानगी दिली आहे,

(५) असल्यास, सदर वाढीव अनधिकृत बांधकाम निष्कासित करून क्षेत्रफळाचे झालेले उल्लंघन याबाबत संबंधित विकासक व झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांवर शासन कोणती कारवाई करणार आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (०३-०८-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३), (४) व (५) हे खरे नाही.

सदर प्रकरणी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने दि.१७.११.२०१७ च्या पत्रान्वये विकासकावर MRTP अधिनियमातील कलम ५३(१) अंतर्गत नोटीस बजावण्यात आली असून पुढील कार्यवाही चालू आहे.

या योजनेमध्ये व्यावसायिक इमारतीला दि.२१.०१.२०१६ रोजी पुढील बांधकाम परवानगी देण्यात आलेली आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून दि.०८.०९.२०१६ रोजीच्या पत्रान्वये क्षेत्रफळाचे उल्लंघन केल्याचे निदर्शनास आल्यानंतर विक्री घटकाच्या बांधकामास कोणत्याही परवानग्या देण्यात आलेल्या नाहीत असा प्राधिकरणाचा अहवाल आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अंधेरीतील जुहू-वर्सोवा लिंक रोडवरील शिवाजीनगर (कपासवाडी) येथील झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पाबाबत**

**(८) ८४७४७ (२१-०४-२०१७). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंधेरीतील जुहू-वर्सोवा लिंक रोडवरील शिवाजीनगर (कपासवाडी) येथील झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प गत दहा वर्षापासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रलंबित प्रकल्पातील झोपडपट्टीवासियांना संक्रमण शिबीरात पाठवून तेथील जागा मोकळी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या मोकळ्या जागेवर इमारती बांधण्याऐवजी या मोकळ्या जागेचा वापर दररोज सुमारे ३५ ते ४० वाहनांच्या अनधिकृत पार्किंगसाठी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त सर्व प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार प्रकल्प लवकर पुर्ण करण्यासाठी व अनधिकृतपणे वाहने पार्किंग करणाऱ्या विकासकांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (२९-०८-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

सदर प्रकल्पामध्ये एकूण १०१० पात्र झोपडीधारकांपैकी ७७७ झोपडीधारकांना भोगवटा प्रमाणपत्र प्रदान करुन नवीन घराचा ताबा देण्यात आला आहे. उर्वरित सदनिकांचे काम गेली तीन वर्षापासून प्रलंबित आहे.

(२) होय, हे खरे आहे.

वर नमूद झोपडीधारकांना ताबा देण्यात आल्यानंतर उर्वरित झोपडीधारकांना पुनर्वसन करण्याचे अनुषंगाने पुढील इमारतीचे काम सुरु करण्याकरीता संक्रमण शिबीरात स्थलांतर करुन जागा मोकळी करण्यात आली आहे.

(३) सदर बाबतीत चौकशी केली असता मोकळ्या जागेवर पार्किंग केलेली वाहने तेथील स्थानिक रहिवाश्यांची असल्याचे आढळून आल्याचा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचा अहवाल आहे.

(४) सदर प्रकल्प पूर्ण करीत नसल्यामुळे विकासकाच्या विरुध्द महाराष्ट्र झोपडपट्टी (सु.नि.व.पु.) अधिनियम, १९७१ मधील कलम १३(२) अन्वये कारवाई करण्यात आली आहे. त्याविरुध्द विकासकाने शिखर तक्रार निवारण समिती (उच्च स्तरिय समिती) समोर दाखल केलेल्या अपिलामध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणा यांचे आदेश अंशत: कायम केले असून त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत असल्याचा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचा अहवाल आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ब्राम्हणदेव सहकारी संस्थेतील पदाधिकाऱ्यांवर कारवाई करणेबाबत**

**(९) ८४७७३ (२१-०४-२०१७). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माहिम (मुंबई) येथील ब्राम्हणदेव एस.आर.ए. सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादीत संस्थेतील चेअरमन/सेक्रेटरी यांनी श्री. सदानंद नागवेकर यांच्या गोडावून क्र.१ च्या भागदाखला व मासिक बीलाच्या अर्जाला झो.पु.प्रा/सनिस/कार्यासन-१/टे.सी.३/६२३/सन २०१७ दिनांक ३ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या आदेशाचे उल्लंघन केल्याचे माहे मार्च, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम सन १९६० चे कलम ७९(२) नुसार श्री.ईटकर, सहाय्यक निबंधक सहकारी संस्था मुंबई शहर झो.पु.प्रा यांनी दिलेल्या आदेशानषंगाने चौकशी करण्याकरिता गेलेल्या श्री.डी.एस.वाघचौरे यांनाही गैरवागणूक दिली व सदर आदेश मान्य नसून त्याप्रमाणे कार्यवाही करणार नसल्याचे संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले हे,ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या संस्थाचालकांविरुध्द शासन चौकशी करुन कारवाई व गुन्हा दाखल करणार आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (२९-०८-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सदर प्रकरणी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमान्वये झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शासनाने सर्व्हेक्षण करुन झोपडपट्टीवासीयांची बायोमेट्रिक पात्रता निश्चित करण्यास सुरुवात केली असल्याबाबत**

**(१०) ८९८१० (०१-०९-२०१७). श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०२२ पर्यंत “सर्वांसाठी घरे” या मा.पंतप्रधान यांच्या घोषणेला मूर्त स्वरूप देण्याच्या दृष्टीने शासनाने राज्यातील झोपडपट्टी पुनर्वसनाचा प्रश्न तातडीने हाती घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने झोपडपट्टीवासीयांची बायोमेट्रिक पात्रता निश्चित करण्यास सुरुवात केली असून सर्व्हेक्षण पथक प्रत्येक झोपडपट्टीत जाऊन झोपडीला क्रमांक देऊन कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीचे बायोमेट्रिक सर्व्हेक्षण करीत आहे व संबंधित झोपडपट्टीचेही चित्रीकरण केले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बेकायदा झोपडपट्टीवासियांना आळा बसावा आणि अधिकृत झोपडपट्टीवासियांना हक्काचे घर मिळावे हा यामागचा हेतू आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सर्व्हेक्षणाचा वेग अत्यंत कमी असल्याने सन २०२२ पर्यंत सर्वांसाठी घर या योजनेला कार्यान्वित होण्यास विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर झोपडपट्टी पुनर्वसन योजनेसाठी परिशिष्ट दोन किंवा पात्रता निश्चित करताना या माहितीचा उपयोग होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, सर्व्हेक्षणाचा वेग वाढवून सन २०२२ पर्यंत सर्वांसाठी घरे ही योजना पूर्ण करण्यासाठी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (१५-०६-२०१८) :** (१) महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु.नि.व पु.) अधिनियम १९७१ मध्ये झालेल्या सुधारणेच्या पार्श्वभूमीवर झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या माध्यमातून अधिकाधिक घरे बांधून झोपडपट्टी पुनर्वसनाचा प्रश्न मार्गी लागणार आहे.

(२) होय.

(३) होय.

(४) हे खरे नाही.

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रामधील एकूण ३२५९ झोपडपट्टी क्लस्टर मधील १९१६५५ झोपड्यांचे डोअर टू डोअर आतापर्यंत सर्वेक्षण पूर्ण करण्यात आले आहे. त्याचबरोबर प्राधिकरणाच्या ठाणे महानगरपालिका क्षेत्रामध्ये झोपडपट्टयांचे सर्वेक्षण सुरु करण्यात आले आहे.

(५) झोपडीधारकांच्या पात्रता तपासण्या व्यतिरिक्त झोपडपट्टयांचे स्थान, क्षेत्रफळ, जमिनीची मालकी निश्चित करण्यासाठी जेणेकरुन झो.पु. योजना मंजूर करण्यास या सर्वेक्षणाचा फायदा होणार आहे.

(६) वर नमूद केल्याप्रमाणे “सर्वांसाठी घरे” देण्याच्या धोरणास अनुसरुन कायद्यामध्ये आवश्यक सुधारणा करण्यात आलेल्या आहेत. त्याखेरीज प्राधिकरणामार्फत सुरु असलेल्या झोपडपट्टयांच्या सर्वेक्षण करण्याच्या कामाचा मु.का.अ./झोपुप्रा वेळोवेळी आढावा घेत आहेत. सक्षम प्राधिकाऱ्याकडे परिशिष्ट-२ प्रमाणित करण्यासाठी पाठपुरावा सुरु आहे. प्राधिकरणाच्या संपूर्ण कामकाजाचे संगणकीकरण करण्यात येत आहे.

---

## वडाळा-घाटकोपर-मुलुंड-तिनहात नाका-कासारवडवली या मुंबई व ठाण्याला जोडणारा मेट्रोमार्ग-४ च्या बांधकामास ठाण्यामध्ये सुरुवात झाली नसल्याबाबत

**(११) ८९९८९ (२३-०८-२०१७). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वडाळा-घाटकोपर-मुलुंड-तिनहात नाका- या मुंबई व ठाण्याला जोडणारा मेट्रोमार्ग-४ च्या बांधकामास ठाण्यामध्ये सुरुवात झाली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मेट्रोमार्ग-४ च्या बांधकामास ठाण्यामध्ये सुरुवात झाली नसल्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, तळोजा ते कल्याणफाटा मार्गे दिवा, डोंबिवली, कल्याण मेट्रो रेल्वे सुरु करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी गत दोन वर्षे सातत्याने करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, वरील दोन्ही मेट्रो रेल्वे कामास केव्हा सुरुवात होणार असून सदर प्रकल्प किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-१०-२०१८) :** (१) नाही
(२) (३) व (४) मेट्रो मार्ग-४ प्रकल्पाकरिता साधारण सल्लागार, सविस्तर संकल्पचित्र सल्लागार यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच प्रकल्पाच्या प्रणालीच्या कामांकरीता एशियन इन्फ्रास्ट्रक्चर इनव्हेस्टमेंट बँकेकडून कर्ज घेण्याची कार्यवाही व या कामांची निविदा प्रक्रीया प्रगतीपथावर आहे. सदर प्रकल्प माहे जुलै, २०२१ पर्यंत प्राधिकरणामार्फत पूर्ण करण्याचे नियोजित आहे.

मुंबई मेट्रो मार्गिका-५ (ठाणे-भिवंडी-कल्याण) या मार्गिकेचा विस्तार करुन कल्याण-डोंबिवली-तळोजा (मेट्रो मार्गिका १२) असा मेट्रो प्रकल्प प्राधिकरणामार्फत प्रस्तावित असून या मार्गिकेचा सविस्तर प्रकल्प अहवाल मे.दिल्ली मेट्रो रेल कार्पोरेशन लि. यांच्यामार्फत तयार करण्यात येत आहे. सदर अहवाल माहे ऑगस्ट, २०१८ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

---

## साईधाम को.ऑप.हौसिंग सोसायटीच्या पदाधिका-यांनी कोटयवधी रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार केल्याबाबत

**(१२) ९०३०२ (०१-०९-२०१७). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) साईधाम को.ऑप.हौसिंग सोसायटीचे रुम नंबर, २०७, २०८ सोसायटीचे कार्यालय रुम नंबर २०९ या आरक्षित रुम परस्पर सोसायटीच्या पदाधिका-यांनी संगनमताने विकून कोटयवधी रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार केल्या प्रकरणी दिनांक ८ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास स्थानिक लोकप्रतिनिधी, कळमनुरी व साईधाम को.ऑप.हौसिंग सोसायटीचे सभासद भाऊराव लोखंडे यांनी मा. गृहनिर्माण मंत्री यांना चौकशी करण्यासंदर्भात निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, श्री. एस.ए. सुर्यवंशी, सहकारी अधिकारी श्रेणी-१ तथा प्राधिकृत अधिकारी झोपुप्रा, मुंबई व श्री. डी. पी. पवार सहकारी अधिकारी श्रेणी-२ तथा प्राधिकृत अधिकारी सहकार कक्ष झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकारी, मुंबई यांनी परस्पर विरोधी अहवाल शासनास सादर करुन तक्रारदाराची व शासनाची दिशाभूल केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग १ व २ नुसार उक्त घटनेची शासनाने चौकशी केली आहे काय, तद्नुसार शासनाने दोषींविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (०९-१०-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही. अर्जदार यांच्या तक्रारीमधील मुळ मुद्दा संस्थेमधील सोयी सुविधांसाठी राखीव सदनिका बळकाविण्यात आल्याबाबत असून झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाद्वारे प्राधिकृत दोन्ही अधिकाऱ्यांच्या अहवालामध्ये सदर बाब खरी असल्याचे आढळून आले आहे. सार्वजनिक सोयी सुविधांच्या सदनिकेत रहिवाशी असून रहिवाशी व्यक्ती भिन्न असल्याचे दोन्ही अहवालात नमूद केले आहे. दोन्ही प्राधिकृत अधिकारी यांनी केलेल्या तपासणीमध्ये कालावधी गेला असल्याने रहिवास करणाऱ्या व्यक्तींमध्ये बदल झाला असावा. तसेच दोन्ही प्राधिकृत अधिकारी यांनी वस्तुस्थितीदर्शक अहवाल सादर केला असल्याने शासनाची अथवा तक्रारदार यांची दिशाभूल केली असे म्हणणे योग्य होणार नाही असा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचा अहवाल आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कुर्ला गांव, लाल बहादुर शास्त्री रोड, कुर्ला (प) मुंबई येथील न.भु.क ७०, ७१, ७१/१ ते २६२, ७६, ७६/१ ते २७ झोपडपट्टी पुर्नवसन योजनेबाबत

**(१३) ९३०४० (०४-०९-२०१७). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कुर्ला गांव, लाल बहादुर शास्त्री रोड, कुर्ला (प) मुंबई येथील न.भु.क ७०, ७१, ७१/१ ते २६२, ७६, ७६/१ ते २७ झोपडपटटी पुर्नवसन योजनेस स्थगिती देऊन कायदेशीर कारवाई करणेबाबत दिनांक ३१ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास लोकप्रतिनिधिंनी मा.गृहनिर्माण मंत्र्यांकडे पत्रव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त योजनेत मुळ मालमत्त्ताधारक व झोपडीधारक यांची नावे वगळून इतर बनावट झोडीधारकांचा समोवश करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बनावट कागदपत्राच्या आधारे झोपडपट्टी पुर्नवसन प्रकल्प राबविण्यात आला आहे, हे ही खेर आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन पुर्नवसन योजनेस स्थगिती देवून दोषींवर कायदेशीर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (०९-१०-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) हे खरे नाही. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून प्राप्त अहवालानुसार बनावट व्यक्ती अथवा बनावट दस्तऐवजाची बाब दिसून येत नाही. तसेच तत्कालीन भूमापकाने

केलेल्या सर्वेक्षणाच्या दरम्यान प्रत्यक्ष वास्तव्य करणाऱ्या झोपडीधारकांनी सादर केलेल्या पुराव्यांच्या पडताळणी अंती दि.३१.०३.२०१० रोजी अंतीम परिशिष्ट-२ पारित करण्यात आले असल्याचे प्राधिकरणाने कळविले आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत विकासकाची नेमणूक करण्याचा अधिकार शासनाकडे घेण्याबाबत**

**(१४) ९४२५४ (०४-०९-२०१७). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या स्वरूपात आमुलाग्र बदल करून सदरहू योजनेसाठी विकासकाची नेमणूक करण्याचा अधिकार शासनाकडे घेण्याबाबतचा आणि सदरहू योजनेत परवडणाऱ्या घरांची निर्मिती करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रस्तावाचे थोडक्यात स्वरूप काय आहे तसेच सदरहू प्रस्तावावर शासनास निर्णय घेण्यास किती कालावधी लागण्याचे अपेक्षित आहे ?

**श्री. प्रकाश महेता (०९-१०-२०१८) :** (१) व (२) झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील विकासकाची नियुक्ती सध्याच्या प्रचलित पध्दतीनुसार झोपडीधारकांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेकडून केली जाते यामध्ये बदल करण्याचे अधिकार शासनाकडे घेण्याबाबत किंवा झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये परवडणाऱ्या घरांची निर्मिती करण्याबाबत कोणताही प्रस्ताव शासन स्तरावर विचाराधिन नाही.

---

**वरळी (मुंबई) येथील मायानगर-अचानक नगर, जिजामाता नगर, स्वामी विवेकानंद नगर, माता रमाबाई आंबेडकर नगर, प्रेमनगर, सिद्धार्थ नगर येथील झोपडपट्टी पुनर्विकास योजनेबाबत**

**(१५) ९५०१६ (३०-१२-२०१७). श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचे प्रलंबित असलेले प्रकल्प तातडीने मार्गी लावण्यासाठी शासनाने केलेल्या तरतुदीनुसार रहिवाश्यांनी जुन्या विकासकास काढून टाकल्यास संबधित विकासकास पुन्हा नेमता येणार नाही, तीन महिन्यांच्या आत ७० टक्के बहुमताने नवीन विकासक नेमावयाचा आहे तसेच ३ महिन्यांच्या आत नवीन विकासक नेमला नाही तर झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण प्रकल्प ताब्यात घेवून बांधकामाची कार्यवाही पूर्ण करणार, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वरळी (मुंबई) येथील मायानगर-अचानक नगर, जिजामाता नगर, स्वामी विवेकानंद नगर, माता रमाबाई आंबेडकर नगर, प्रेमनगर, सिद्धार्थ नगर इत्यादी झोपडपट्टी पुनर्विकासाचा योजना मागील अनेक वर्षे प्रलंबित असल्याने सदर झोपडपट्टीतील रहिवाशांवर अन्याय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू झोपडपट्टी पुनर्विकासाच्या योजनेची कामे लवकरात लवकर पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (०२-०८-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) मायानगर-अचानक नगर झोपडपट्टी पुनर्वसन योजनेकरीता दि. १६.०६.१९९६ रोजी आशयपत्र व सुधारित आशयपत्र दि. २३.०२.२०११ रोजी दिलेले असून मंजूर नकाश्याप्रमाणे पुनर्वसन इमारत क्र. १,२ व ३ अ बांधून २१९ झोपडपट्टी धारकांची पुनर्वसन करण्यात आलेले आहे. जिजामाता नगर, स्वामी विवेकानंद नगर, माता रमाबाई आंबेडकर नगर महाराष्ट्र शासनाने झोपडपट्टी अधिनियम १९७१ च्या कलम ३-K(१) अन्वये दिलेल्या निर्देशानुसार भुकर क्र. १७/४७ (भाग) लोअर परळ विभाग डॉ. ई मोझेस मार्ग, वरळी, जी/दक्षिण विभाग येथील जीवनज्योत सहकारी गृहनिर्माण संस्था (नियो.) श्री. स्वामी विवेकानंद सहकारी गृहनिर्माण संस्था (नियो.) माता रमाबाई नगर सहकारी गृहनिर्माण संस्था (नियो.) आणि वीर जिजामाता नगर सहकारी गृहनिर्माण संस्था (नियो.) या झोपडपट्टी समुहांचा एक संघ पुनर्विकास करण्याबाबत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या दि.३१.१२.२०१२ च्या पत्रान्वये विषयांकित जमिनीवरील आशय पत्र महानगरपालिकेला निर्गमित करण्यात आले आहे.

प्रेमनगर, सिध्दार्थ नगर योजनेचा पुनर्विकासासंदर्भात मा. उच्च न्यायालय यांनी रिट पिटीशन ३०१६/२०१४ अन्वये जैसेथे आदेश दिलेले आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील म्हाडाच्या ५६ वसाहतीचा पुनर्विकास करण्याबाबत

**(१६) ९५५८९ (३०-१२-२०१७). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील म्हाडाच्या ५६ वसाहतीमधील जुन्या इमारतींचा पुनर्विकास करण्याचा निर्णय शासनाने घेतल्यानंतर ज्या सहकारी गृहनिर्माण संस्थांना म्हाडाने नाहरकत प्रमाणपत्रे पुनर्विकासाबाबत दिले आहेत अशी किती सोसायट्यांनी पुनर्विकासाचे काम सुरु केले आहे,
(२) असल्यास, म्हाडाने पुनर्विकासाबाबतचे नाहरकत प्रमाणपत्र देऊनही ज्या सोसायट्यांनी अद्याप पुनर्विकासाचे काम सुरु केलेले नाही त्यांची नाहरकत प्रमाणपत्रे रद्द करण्याचाही निर्णय म्हाडाने घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, म्हाडाच्या ५६ वसाहतींचा पुनर्विकास करण्याच्या दृष्टीने विकास नियमावलीतील फेरबदलानंतर म्हाडाकडे १३ सहकारी गृहनिर्माण संस्थांनी पुनर्विकासाचे प्रस्ताव सादर केले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रस्तावाची छाननी करुन म्हाडाने आतापर्यंत किती गृहनिर्माण संस्थांना देयकारपत्र दिली आहेत व मुंबईतील बीडीडी चाळींच्या पुनर्विकासात ज्या प्रमाणे म्हाडा नोडल एजन्सी म्हणून काम बघणार आहे त्या प्रमाणेच ५६ वसाहतीच्या पुनर्विकासात म्हाडाला नियोजन प्राधिकरणाचा (प्लॅनिंग अथॉरिटी) दर्जा मिळावा असाही प्रस्ताव म्हाडाने शासनाकडे सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, त्यानुषंगाने शासनाने काय निर्णयात्मक कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (१९-१०-२०१८) :** (१) उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण यांच्या अहवालानुसार अद्यापपर्यंत ६४० सहकारी गृहनिर्माण संस्थांनी पुनर्विकासाचे काम सुरु केले आहे.

(२) हे खरे नाही.

(३) वि.नि.नि. ३३(५) दि. ०३ जुलै २०१७ च्या फेरबदलाच्या अधिसुचनेनूसार आजपर्यंत १०५ सहकारी गृहनिर्माण संस्थांनी पुनर्विकासाचे प्रस्ताव सादर केलेले आहेत.

(४) अद्यापपर्यंत ३६ सहकारी गृहनिर्माण संस्थांना देकार पत्र जारी करण्यात आलेले आहेत. ५६ वसाहतीच्या पुनर्विकासात म्हाडाला नियोजन प्राधिकरणाचा (प्लॅनिंग ॲथोरिटी) दर्जा मिळावा असा प्रस्ताव म्हाडाने दि. १५ मे २०१८ रोजी शासनाकडे सादर केला होता.

(५) नगर विकास विभागाच्या दि. २३ मे २०१८ रोजीच्या अधिसूचनेनुसार ५६ वसाहतीच्या पुनर्विकासाकरीता म्हाडास नियोजन प्राधिकरणाचा (प्लॅनिंग ॲथोरिटी) दर्जा देण्यात आला आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्य शासनाच्या गृहनिर्माण विभागाने तसेच झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरणाने त्यांच्या योजनांचा घेतलेला आढावा

**(१७) ९६१८२ (३०-१२-२०१७). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या गृहनिर्माण विभागाने तसेच एसआरएने माहे जानेवारी, २०१६ ते जुलै, २०१७ या काळातील एसआरए योजनांचा आढावा माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान घेतला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आढाव्यात शासनास काय आढळून आले आहे, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (२७-०८-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बोराळा (ता.रिसोड,जि.वाशिम) येथील अडोळ प्रकल्पावरुन रिसोडकडे जाणा-या जलवाहिनीवर लावण्यात आलेला व्हॉल्व्ह नादुरुस्त असल्याबाबत**

**(१८) ९८८९९ (२६-१२-२०१७). श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोराळा (ता.रिसोड,जि.वाशिम) येथील अडोळ प्रकल्पावरुन रिसोडकडे जाणा-या जलवाहिनीवर लावण्यात आलेला व्हॉल्व्ह नादुरुस्त असल्यामुळे रोज लाखो लिटर पाणी वाया जात असून गावात पाण्याचा अपुरा पुरवठा होत असल्याचे माहे ऑक्टोबर,२०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर व्हॉल्व्हची पाहणी केली आहे काय व पाहणीत काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार सदरहू व्हॉल्व्हची तातडीने दुरुस्ती करण्यासह या दुरुस्तीकडे दुर्लक्ष करणा-या संबंधित दोषींवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-१०-२०१८) :** (१) ऑक्टोबर, २०१७ मध्ये अशी घटना घडल्याचे दिसून आले नाही. तथापि, जून, २०१७ मध्ये ढोरखेडा येथे व्हॉल्व नादुरुस्त झाल्याने गळती झाली होती. सदर व्हॉल्व तातडीने कायमस्वरुपी बंद करण्यात आला आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वांद्रे (पूर्व) येथील सी.टी.एस. क्र. ६२९ (भाग), सर्व्हे नं.३४१ (भाग) शासकीय वसाहतीमधील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेबाबत**

**(१९) १००३५६ (०१-०१-२०१८). श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वांद्रे (पूर्व) येथील सी.टी.एस. क्र. ६२९ (भाग), सर्व्हे नं.३४१ (भाग) शासकीय वसाहतीमध्ये झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत बालाजी शॉपकिपर प्रीमायसेस को.ऑ.हौ.सोसायटीने इमारत बांधण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाचे खोटे नाहरकत प्रमाणपत्र सादर करुन दुकानदारांना गाळे वितरीत केले आहेत याबाबतच्या तक्रारी स्थानिक कार्यकर्ते व नागरिकांनी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे व सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच जिल्हाधिकारी, मुंबई उपनगरे यांच्याकडे सन २०१६ पासून वारंवार केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने सुरु असलेल्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (०२-०८-२०१८) :** (१) होय. हे खरे आहे.
(२) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने योजनेच्या विक्री घटकास स्थगिती आदेश दिले आहेत. त्यासंबंधी आशापुरा बिल्डर्स आणि डेव्हलपर्स व इतर यांनी मा.उच्च न्यायालयात रिट याचिका क्र.१२१३/२०१८ दाखल केली होती. सदर याचिकेवर मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने दि.०५.०६.२०१८ रोजीच्या पत्रान्वये याचिकाकर्ता, सोसायटी व सार्वजनिक बांधकाम विभाग यांना सुनावणीची नोटीस दिली होती. या प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांच्यासमोर दि.२२.०६.२०१८ रोजी सुनावणी ठेवण्यात आली असल्याने दाखल केलेली याचिका मागे घेण्याची संमती मा.उच्च न्यायालयाने दिलेली असून सदर प्रकरणात मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांच्या स्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ग्रामपंचायत दवलामेटी येथील घराच्या प्रतिक्षेत असलेल्या १२० सभासंदाना न्याय मिळण्याबाबत**

**(२०) १०११८० (३०-१२-२०१७). श्री.समिर मेघे (हिंगणा) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ग्रामपंचायत दवलामेटी येथील घराच्या प्रतिक्षेत असलेल्या १२० सभासंदाना न्याय मिळण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २६ जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास अध्यक्ष, म्हाडा यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी निर्णय होवुनही अद्याप पावेतो बांधकाम सुरु न करण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, सदर बांधकाम सुरु करण्यास निश्चित किती कालावधी लागणार आहे,
(४) असल्यास, शासनाने या प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (११-१०-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२), (३), (४) व (५) नागपूर गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळामार्फत १२० अल्प उत्पन्न गट भूखंड वाटप योजना तयार करण्यात आली होती. त्यानंतर नागपूर सुधार प्रन्यास यांच्यामार्फत अभिन्यासात सुधारणा करण्यात आली. त्यानुसार १२० भूखंडाऐवजी ८२ भूखंडच उक्त जागेवर उपलब्ध झाले. त्यामुळे ८२ भूखंड १२० भूखंडधारकांना वाटप करण्याचा प्रश्न निर्माण झाला व त्यामुळे सदर विषय प्रलंबित राहीला.

तथापि, भूखंडधारकांना ११२.५ चौ.मी. ऐवजी १०१.२५ चौ.मी. क्षेत्रफळाचा विकास कामासहीत भूखंड देण्याचे प्रस्तावित असून त्या अनुषंगाने महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणामार्फत उचित निर्णय घेण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

---

## मुंबई म्हाडाकडून अत्यल्प दरात भूखंड मिळवून इमारती उभारणाऱ्या गृहनिर्माण संस्थांनी भुईभाडे भरले नसल्याबाबत

**(२१) १०५१८२ (०३-०४-२०१८). श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्री.संजय कदम (दापोली), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई म्हाडाकडून अत्यल्प दरात भूखंड मिळवून इमारती उभारणाऱ्या गृहनिर्माण संस्थांनी तसेच शिक्षणसंस्थांनी भुईभाडे भरलेले नाही अशा किती गृहनिर्माण संस्था आहेत,

(२) असल्यास, ज्या संस्थांनी भूखंडावर बांधकाम केलेले नाही तसेच भुईभाडे भरले नाही त्यांच्यावर म्हाडाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, ज्या गृहनिर्माण संस्था व शिक्षणसंस्थांनी भुईभाडे भरले नाही त्यांची नांवे काय आहेत,

(४) असल्यास, ज्या संस्थांनी भूखंड घेतले आहेत व गेल्या १५ वर्षात बांधकाम केले नाही अशा संस्थांकडून भूखंड परत घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (१९-१०-२०१८) :** (१) उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार मुंबई म्हाडाकडून अत्यल्प दरात भूखंड मिळवून पूर्णत: भूईभाडे भरलेले नाहीत अशा २ गृहनिर्माण संस्था असून अंशत: भूईभाडे भरलेल्या गृहनिर्माण संस्था १२ असून शिक्षण संस्था ३ आहेत.

(२) ज्या गृहनिर्माण संस्था व शिक्षणसंस्थांनी भुईभाडे भरले नाही अशा संस्थांना व्याजासहीत थकीत भूईभाडे भरण्याबाबत कळविले आहे मात्र ज्या संस्थेनी अद्यापपर्यंत भूईभाडे व व्याजाची भरणा केलेली नाही अशा संस्थांचा आर.आर.सी. चा प्रस्ताव जिल्हाधिकारी / मुंबई व मुंबई उपनगरे यांच्याकडे पाठविण्यात आलेला आहे. ज्या संस्थांनी भूईभाडे रक्कमेचा अंशत: भरणा केलेला आहे व उर्वरित थकीत रक्कम व्याजासह भरणा केलेले नाही अशा संस्थेविरोधात संस्थेचे लेखापरिक्षण करुन प्रशासक नेमण्याचा प्रस्ताव उपनिबंधक, म्हाडा यांच्याकडे सादर केला आहे. तसेच आर.आर.सी. च्या माध्यमातून संस्थेचे बँक खाते गोठविण्याची कार्यवाहीदेखील प्रस्तावित आहे.

(३) १. एक्सलन्सी सहकारी गृहनिर्माण संस्था, वर्सोवा

२. गोल्डन सॅन्डस सहकारी गृहनिर्माण संस्था, वर्सोवा

अंशत: भूईभाडे रक्कम भरलेल्या संस्था

गृहनिर्माण संस्था : १.शिवांजली (केबीज) २.आकाशगंगा (यशोदिप) ३.ज्वेल ४.श्री साई ५.विघ्नहर्ता ६.महालक्ष्मी ७.सिटीझन ८.पॉपीलॉन ९.पृथ्वीराज १०.महाराष्ट्र राज्य पोलिस कर्मचारी ११. सागर दर्शन १२. भद्रकाली

शिक्षण संस्था : १.टिळक नगर एज्युकेशन सोसायटी २.महाराष्ट्र विद्या विकास मंडळ, ३.जे ओ डिसुझा डॉमिक सॅवी स्कुल.

(४) ज्या गृहनिर्माण संस्थांनी भूखंड घेतलेले आहेत व गेल्या १५ वर्षात भूखंडावर बांधकाम केलेले नाही अशा संस्थांकडून परत भूखंड घेण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अंधेरी (मुंबई) येथील अण्णानगर, कासमनगर, विठ्ठल-रुक्मिणी या तीन सोसायट्यांच्या पुनर्विकासाबाबत

**(२२) १०६००३ (०७-०४-२०१८). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंधेरी (मुंबई) येथील अण्णानगर, कासमनगर, विठ्ठल-रुक्मिणी या तीन सोसायट्यांच्या पुनर्विकासासाठी विकासक मे.के.एस. चमणकर व भागीदार एल अँड टी कंपनीची एसआरए प्रकल्पांतर्गत सन १९९९ मध्ये नियुक्ती करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिलेल्या मुदतीत सभासदांना घरे उपलब्ध करुन देण्यास मे. के.एस.चमणकर अपयशी ठरल्याने चमणकर व एल अँड टी कंपनीला या प्रकल्पातून हटविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कंपनीचे बाऊंसर्स संबंधित सोसायट्यांच्या पदाधिकाऱ्यांना व सभासदांना धमकावत असल्याची तक्रार पोलीस आयुक्तांकडे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने उक्त कंपन्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी दोन्ही कंपन्यांचे राज्यातील सर्व प्रकल्प त्वरीत बंद करुन अन्य कंपन्यांना देण्याबाबत शासन कोणती कार्यवाही करणार वा करित आहे,नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (०२-०८-२०१८) :** (१) अण्णानगर, कासमनगर, विठ्ठलरुक्मिणी या तीन सोसायट्यांच्या पुनर्विकासासाठी विकासक मे. के. एस. चमणकर यांची सन १९९९ मध्ये नियुक्ती करण्यात आली होती.
(२) महाराष्ट्र झोपडपट्टी कायदा (सु.नि.व.पू.) अधिनियम १९७१ मधील कलम १३ (२) अन्वये विकासक मे. के. एस. चमणकर यांची नियुक्ती रद्द करण्यात आली आहे.
(३) अंबोली पोलीसात तक्रार प्राप्त असून तक्रार अर्जातील अर्जदार व विरोधक यांच्यात झोपडपट्टी पुनर्वसन योजनेबाबत वाद आहेत. त्याठिकाणी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये याकरीता संबंधिताच्या अंबोली पोलीस ठाणे येथे बैठका घेण्यात आल्या आहेत. तसेच संबधित अर्जदार व विरोधक यांना फौजदारी दंड प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम १४९ अन्वये शांततेचा भंग न करण्याबाबत नोटीसा देण्यात आल्या आहेत. सदर प्रकरणात अंबोली पोलीस ठाणे येथे दि.२४.०४.२०१८ रोजी अदखलपात्र गुन्हा नोंद क्र. ११४५/२०१८, भादंवि कलम ५०६ अन्वये नोंद करण्यात आलेला आहे, असा मुंबई पोलीसांचा अहवाल आहे.
(४) व (५) शिखर तक्रार निवारण समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांचे विकासक नियुक्ती रद्द करण्याबाबतचे आदेश कायम केले आहेत. विकासकाने सदर आदेशाविरुध्द मा. उच्च न्यायालय मुंबई, येथे दावा दाखल केला असून प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

---

**करमाळा शहरातील (ता.करमाळा, जि.सोलापूर) नगरपालिकेच्या 'जयप्रकाश नारायण टाऊन हॉल' या भव्य इमारतीची दुरवस्था झाल्याबाबत**

**(२३) १०७२८४ (१८-०४-२०१८). श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) करमाळा शहरातील (ता.करमाळा, जि.सोलापूर) नगरपालिकेच्या 'जयप्रकाश नारायण टाऊन हॉल' या भव्य इमारतीची अत्यंत दयनीय दुरवस्था झाल्याने दुरुस्ती, नुतनीकरण व आधुनिकीकरण यासाठी पुरेसा निधी उपलब्ध करुन द्यावा अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २२ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री यांचेकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदन मा.मुख्यमंत्री यांनी सचिव, नगरविकास विभाग यांचेकडे कार्यवाहीसाठी पाठविले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर टाऊन हॉलच्या इमारतीच्या दुरुस्ती, नुतनीकरण व आधुनिकीकरणासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, त्यानुषंगाने पुढील कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-१०-२०१८) :** (१) व (२) करमाळा शहरातील जयप्रकाश टाऊन हॉल चे नुतनीकरण व आधुनिकीकरणासाठी निधी उपलब्घ करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीचे दि.२२.११.२०१७ चे निवेदन प्राप्त झाले आहे, हे खरे आहे.
(३) व (४) • करमाळा शहरातील जयप्रकाश नारायण टाऊन हॉल सुमारे ३५ वर्षापूर्वी बांधण्यात आले आहे.
• सदर सभागृह वापरणे योग्य नसल्याने ते पाडण्याचा ठराव नगरपरिषदेने केला असल्याचा अहवाल मुख्याधिकारी, करमाळा यांनी सादर केला आहे.

---

**मुंबईतील ताडदेव, घाटकोपर व कांदिवली येथील म्हाडाच्या पुनर्वसन प्रकल्पांमध्ये झालेला गैरव्यवहार**

**(२४) ११०३५० (०६-०४-२०१८). श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील ताडदेव येथील एमपी मिल कंपाऊंड झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पात तसेच घाटकोपर व कांदिवली येथील समता नगर या ठिकाणच्या म्हाडाच्या पुनर्वसन प्रकल्पांमध्ये मोठया प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी पूर्ण झाली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानूसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (२८-०९-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही. न.भू.क्र. ७२५ (पै)/१/७२५(पै) आणि ३/७२५ (पै) मलबार हिल येथील नियोजित महाराष्ट्र नगर डी वॉर्ड तसेच जायफळवाडी आणि जनता हिल झोपडपट्टी पुनर्वसन योजनेसंदर्भात गृहनिर्माण विभागाच्या धारिकेतील प्रस्तावावर चौकशी करण्यासाठी, महाराष्ट्र लोक आयुक्त व उप लोक आयुक्त अधिनियम, १९७१ मधील कलम १७(३) नुसार, मा.राज्यपाल महोदयांनी मा.लोक आयुक्त यांना सदर प्रकरण निर्देशित केले असून मा. लोक आयुक्त यांचेकडे सदर चौकशीची कार्यवाही सुरु आहे.

समतानगर, कांदिवली (पूर्व) येथील विकास नियंत्रण नियमावली ३३ (५) अंतर्गत सुरु असलेल्या पुनर्विकास प्रकल्पाबाबत उच्चस्तरिय समितीद्वारे चौकशी सुरु आहे. तसेच पंतनगर, घाटकोपर येथील संक्रमण शिबीराच्या लगत असलेल्या सर्व झोपडपट्टयांचे भूखंड हे विना विकास क्षेत्रात बाधित असल्याने अविकसनक्षम (Non Buildable) आहेत त्यामुळे सदर ०७ झोपडपट्टया व पंतनगर, घाटकोपर येथील न.भू.क्र.१९४ (भाग) वरील म्हाडाच्या मालकीची संक्रमण शिबीरे मिळून एकत्रित पुनर्विकास करण्याचा वि.नि.नि. ३३(१०) नुसार करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन होता. त्यानुसार सदरहू संक्रमण शिबीरे व परिसरातील ०७ झोपडपट्टयांचा एकत्रित पुनर्विकास वि.नि.नि.३३(१४) ऐवजी ३३(१०) मध्ये रुपांतरित करुन शासनाने शासन निर्णय झोपुयो-१२०३/प्र.क्र.२४१/२०१६/झोपसु-१, दि.०६.०१.२०१७ अनुसार मान्यता दिली आहे. हे आदेश कोणत्याही विकासकाचा नामनिर्देश करुन काढण्यात आलेले नाहीत. तसेच या एकत्रित योजनेत अद्याप कोणत्याही विकासकाचा प्रस्ताव दाखल झालेला नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हदगांव नगरपालिकेत (जि.नांदेड) पंतप्रधान आवास घरकूल योजनेचे दोन हजार अर्ज एक वर्षापासून प्रलंबित असल्याबाबत**

**(२५) ११०३६१ (१२-०४-२०१८). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हदगांव नगरपालिकेत (जि.नांदेड) पंतप्रधान आवास घरकूल योजनेचे दोन हजार अर्ज एक वर्षापासून प्रलंबित असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचे अर्ज प्रलंबित असण्याची कारणे का आहेत,

(३) असल्यास, लाभार्थ्यांना घरकूल योजनेचा लाभ तातडीने देण्याबाबत शासन कोणती कार्यवाही करणार वा करित आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (१९-१०-२०१८) :** (१), (२) व (३) प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत हदगांव नगरपरिषदेमार्फत २२२७ अर्ज लाभार्थ्यांना वितरीत करण्यात आले होते. त्यापैकी १५४६ अर्ज लाभार्थ्यांकडून प्राप्त झाले आहेत. हदगांव नगरपरिषदेने दि.२३.६.२०१७ रोजी घटक क्रमांक ४ खाली छाननी करुन एकूण ६०८ घरकुलाचा सविस्तर प्रकल्प अहवाल म्हाडास सादर केला होता, सदर अहवालात त्रुटी आढळून आल्याने, हदगांव नगरपरिषदेने सुधारित सविस्तर प्रकल्प अहवाल दिनांक ०४.०४.२०१८ रोजी म्हाडास फेरसादर केला.

हद्गाव नगरपरिषदेने प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत घटक क्रमांक ४ खाली सादर केलेल्या ६०८ घरकुलाच्या सुधारित सविस्तर प्रकल्प अहवालास केंद्रीय मान्यता व सनियंत्रण समितीच्या दिनांक २७.०४.२०१८ रोजीच्या ३३ व्या बैठकीत मान्यता प्राप्त झाली असून, त्याअनुषंगाने पुढील कार्यवाही चालू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पुणे येथे स्वच्छतागृहाअभावी एका महिलेचा मृत्यू झाल्याबाबत**

**(२६) ११०४७९ (१२-०४-२०१८). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुण्यातील कात्रज परिसरात दिनांक ०१ जानेवारी, २०१८ रोजी स्वच्छतागृहाअभावी सौ.अनिता वामन नाकाडे यांचा तुटलेल्या विजेच्या तारांचा धक्का लागून मृत्यू झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आळंदी शहरात तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातून विकसित करण्यात आलेली स्वच्छतागृहे देखभाल दुरुस्ती अभावी कुलुपबंद असल्याने नागरिकांना त्यांचा वापर करणे अवघड झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोट्यवधी रुपये खर्च करून बांधण्यात आलेली स्वच्छतागृहे बंद पडून असल्याने त्यांचा वापर करणे शक्य होत नसल्याने सदर स्वच्छतागृहे नगरपरिषदेमार्फत तत्काळ सुरु करण्याबाबत कोणती उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,

(४) असल्यास, पुण्यासाख्या प्रगत शहरात स्वच्छता गृहाअभावी मृत्यू पावलेल्या महिलेच्या कुटूंबाला आर्थिक मदत देण्याबाबत तसेच उक्त ठिकाणी तातडीने स्वच्छतागृह बांधण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-१०-२०१८) :** (१), (२), (३) व (४) • श्रीमती अनिता नाकाडे या कात्रज पी.एम.पी.एल, पुणे, गणेश पार्क जवळून जाणाऱ्या रस्त्याच्या कडेला एका गाडीच्या आडोश्याला गेल्या असता त्यांचा विजेचा धक्का लागून मृत्यू झाला ही वस्तूस्थिती आहे.

• तथापी सदर महिलेचे अपघाती निधन झालेल्या स्थळापासून अंदाजे ३०० मी. परीघात चार शौचालयाची व्यवस्था पुणे महानगरपालिकेने केलेली आहे.

• आळंदी नगर परिषद हद्दीमध्ये शासनाच्या तिर्थक्षेत्र विकास आराखड्यांतर्गत एकूण २० शौचालयाची बांधकामे पुर्ण करण्यात आलेली आहेत.

• आळंदी शहरात होणाऱ्या कार्तिकी व आषाढी यात्रा सन २०१७-१८ च्या दरम्यान शहरातील नगरपरिषदेच्या अखत्यारीत असलेली सर्व शौचालयाच्या देखभाल दुरुस्तीच्या अनुषंगाने वार्षिक निविदा प्रसिध्द करुन कंत्राटदारामार्फत दुरुस्तीची कामे यात्रा कालावधीपुर्वी पुर्ण करण्यात आलेली आहेत. सदरची शौचालये वापरण्या योग्य ठेवण्यात आलेली आहेत.

• तसेच शासनाच्या तिर्थक्षेत्र विकास आराखड्यांतर्गत केळगाव चौक, वडगाव रोड, वाय जंक्शन या ठिकाणी बांधण्यात आलेली सुलभ शौचालये सुस्थितीत असून मे. सुलभ इंटरनॅशनल यांच्या मार्फत नियमीत साफसफाई केली जाते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सदगुरु नगर या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमधील प्रकल्पग्रस्त सदनिका विकासकाने विकून शासनाची फसवणूक केल्याबाबत**

**(२७) ११२४११ (०३-०४-२०१८). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सदगुरु नगर, मागाठाणे, बोरिवली (पूर्व) मुंबई या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमधील प्रकल्पग्रस्त सदनिका विकासकाने विकून शासनाची फसवणूक केल्यामुळे गुन्हा दाखल करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १४ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बांद्रा, मुंबई यांच्याकडे लेखी तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे व केलेल्या कारवाईचे स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (२७-०८-२०१८) :** (१) स्थानिक लोकप्रतिनिधी दि.१४ ऑक्टोबर, २०१७ रोजीच्या सुमारास मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई यांच्याकडे लेखी तक्रार केली होती. सदर निवेदनामध्ये विकासकावर गुन्हा दाखल करण्याबाबतचा कोणताही उल्लेख केलेला नाही.

(२) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने त्यांच्या दि.२७.१०.२०१७ च्या पत्रान्वये संबंधित कागदपत्रे मा.श्री.प्रकाश सुर्वे, वि.स.स. यांना पाठविली आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील अपंगांच्या ३ टक्के निधी आणि ३ टक्के गाळे वाटपाबाबत**

**(२८) ११४१४१ (२३-०४-२०१८). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अपंगांच्या ३ टक्के निधी आणि ३ टक्के गाळे वाटपाबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या अन्नत्याग आंदोलनानिमित्त मा.मुख्यमंत्री, राज्यमंत्री, सामाजिक न्याय मंत्री, पालकमंत्री यांनी दिनांक २४ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास दिलेल्या आश्वासनानुसार शासन स्तरावर आढावा घेऊन निधी उचित आणि योग्य कारणांकरता तसेच दिव्यांग्यांच्या व्यक्तिगत कारणांसाठी खर्च करण्याबाबतचे निर्देश मा.मुख्यमंत्री महोदय यांनी दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उक्त प्रकरणी शासनाने अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-१०-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) • महानगरपालिका/नगरपालिकांमध्ये दिव्यांगांसाठी किमान ३ टक्के निधी राखीव ठेवण्याच्या व खर्च करण्याच्या शासन स्तरावरून दि.१४.११.२०१७ रोजीच्या परिपत्रकान्वये सूचना देण्यात आलेल्या आहेत.
• तद्नंतर केंद्र शासनाच्या Persons With Disabilities Act, २०१६ नुसार सर्व महानगरपालिका/ नगरपालिकांमध्ये अपंगांसाठी ५% निधी राखीव ठेवण्याचा दि. १०.०५.२०१८ च्या परिपत्रकान्वये निर्णय घेण्यात आलेला आहे.
• सर्व महानगरपालिकांच्या दिव्यांगासाठीच्या ३ टक्के निधीचा आढावा मंत्रालय स्तरावर नगर विकास विभागामार्फत दि.१७.०३.२०१८ व दि. १.०९.२०१८ रोजी घेण्यात आलेला आहे.
• नगरपालिकांचा दिव्यांगाच्या ३ टक्के निधीचा नियमित आढावा घेण्याबाबत संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांना दि. १४.११.२०१७ च्या परिपत्रकान्वये सूचना देण्यात आलेल्या आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भिवंडी महानगरपालिकेच्या नागाव येथील आरक्षित जागेवर अतिक्रमण करुन बांधलेल्या जागेवरील गोदामांना लागलेली आग

**(२९) ११४४९२ (१२-०४-२०१८). श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिवंडी येथील वन विभाग व भिवंडी महानगरपालिकेच्या नागाव येथील आरक्षित जागेवर बेकायदा अतिक्रमण करुन बांधलेल्या जागेवरील गोदामांना दिनांक १ फेब्रुवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास आग लागून आगीमध्ये २३ गोदामे व ६ झोपडया जळून भस्मसात झाल्या, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व सदर आगीमुळे किती नुकसान आले आहे तसेच सदर आग लागण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, आगीमुळे नुकसान झालेल्या नुकसानग्रस्तांना शासनाने कोणती मदत केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०९-२०१८) :** (१) होय, हे अशंत: खरे आहे. दिनांक ३१.०१.२०१८ रोजी आग लागुन आगीमध्ये १५ भंगाराचे गोडावून व ६ खोल्या जळून भस्मसात झाल्या असल्याचे भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका यांनी कळविले आहे.
(२), (३) व (४) भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेने सदर ठिकाणी अनधिकृतरित्या उभारलेल्या पत्राशेड असलेल्या दुकान धारकांना बांधकाम परवानगीचे व मालकी हक्काचे कागदपत्रे सादर करण्याबाबत नोटीस बजाविण्यात आली असल्याचे कळविले आहे.

तथापि, उपरोक्त दुर्घटनेसारखे प्रकार पुन्हा उद्भवू नये याबाबत दक्षता घेण्याच्या सूचना आयुक्त, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका यांना देण्यात आल्या आहेत.

---

**पुणे महानगरपालिकेकडे महा मेट्रोने मागणी केलेल्या जागांबाबत**

**(३०) ११४८३३ (१८-०४-२०१८). प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महामेट्रोकडून महानगरपालिकेकडे मेट्रोच्या स्टेशन, माहिती केंद्र, पार्किंग आदिंसाठी शहरातील विविध जागांसाठी प्रस्ताव पाठवण्यात आले असून महानगरपालिकेकडून मात्र आत्तापर्यंत मागितलेल्या जागांपैकी फक्त दोनच जागा उपलब्ध करून दिल्या असल्याचे माहे जानेवारी,२०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मेट्रोला भाडेतत्त्वावर दिलेल्या जागांसाठीही जादा दर आकारण्यात येत असून महानगरपालिकेकडून एक प्रकारे महामेट्रोची लुटच करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मेट्रोच्या डब्याची प्रतिकृती व प्रकल्पाची माहिती केंद्र उभारण्यासाठी ३ गुंठे जागा आवश्यक असून शहरातील पेशवे पार्क येथील जागा मागितली असता महानगरपालिकेने मात्र १ गुंठाच जागा देण्याची तयारी दाखवली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय,त्यात काय आढळून आले, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-१०-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

महामेट्रोने पुणे मनपाकडे मागणी केलेल्या जागांपैकी माहिती केंद्र उभारण्यासाठी आनंदनगर येथील फुटपाथची जागा, आणि मेट्रो डेपो आणि स्टेशन करिता आवश्यक असणारी स्वारगेट पाणीपुरवठा येथील २८,००० चौमी जागा आणि कोथरूड कचरा डेपोची २८ एकर ५ गुंठे जागेचा ताबा महामेट्रोस देणेत आलेला आहे.

(२) नाही.

(३), (४) व (५) पुणे मेट्रो प्रकल्पाचे माहिती केंद्र उभारण्यासाठी ५ गुंठे (५०० चौ.मी.) जागा आवश्यक असल्याने मंजूर केलेली पेशवे पार्क येथील १ गुंठा (१०० चौ.मी.) जागेचा फेरविचार करुन ५ गुंठे (५०० चौ.मी.) जागा मंजूर करण्याच्या अनुषंगाने महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशनने पुणे महानगर पालिकेकडे विनंती केली होती. पेशवे पार्क येथील अपुऱ्या जागेमुळे सदरची जागा रद्द करुन संभाजी उद्यान येथील २ गुंठे जागा, मेट्रोच्या डब्याची प्रतिकृती व प्रकल्पाची माहिती केंद्र उभारण्यासाठी पुणे महानगरपालिकेमार्फत महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन (महामेट्रो), पुणे यांना उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

---

**तिवसा (जि.अमरावती) नगरपंचायतीमधील पाणी टंचाईसाठी निधी उपलब्ध करुन देणेबाबत**

**(३१) ११६०८६ (१२-०४-२०१८). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तिवसा (जि.अमरावती) नगरपंचायतीतधील पाणी टंचाईसाठी निधी उपलब्ध करुन देणेबाबत व कृती आराखडयात समाविष्ठ करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी वारंवार शासनाकडे निवेदन दिले असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त परिसरातील पाणी टंचाईसाठी निधी उपलब्ध करुन देणेबाबत शासन विलंब करीत असल्याने नागरिकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-१०-२०१८) :** (१) होय, अशा आशयाचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी, अमरावती यांना दिले होते.

(२) व (३) • याबाबतचा नगरपंचायतीचा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाने दिनांक २७ नोव्हेंबर, २०१७ च्या पत्रान्वये विभागीय आयुक्त, अमरावती यांना सादर केला होता.

• सदर प्रस्ताव परिपूर्ण नव्हता. सबब, विभागीय आयुक्त कार्यालयाने पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे शासन निर्णय नमूद करुन त्यानुसार शहानिशा करुन परिपूर्ण प्रस्ताव पाठविण्यास जिल्हाधिकारी, अमरावती यांना डिसेंबर, २०१७ व मार्च, २०१८ मध्ये कळविले.

• पूर्णवेळ पाणी पुरवठा अभियंता उपलब्ध नसल्याने परिपूर्ण प्रस्ताव लवकरच सादर करण्यात येईल, तोपर्यंत पाणी टंचाई निवारण कार्यक्रमांतर्गत रुपये ६ लक्ष एवढी रक्कम तत्वत: मान्य करावी, असे नगरपरिषदेने विभागीय आयुक्तांना कळविले होते. तथापि, परिपूर्ण प्रस्तावाअभावी सदर बाब कृती आराखड्यात समाविष्ट केली गेली नसल्याचे दिसते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भिवंडी-निजामपूर (जि.ठाणे) शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील रस्त्यांची कामे एमएमआरडीएकडून तातडीने मंजूर करणेबाबत**

**(३२) ११६३७२ (१२-०४-२०१८). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी-निजामपूर (जि.ठाणे) शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील रस्त्यांची कामे एमएमआरडीएकडून तातडीने मंजूर करणेबाबत दिनांक ११ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास प्रधान सचिव, नगरविकास विभाग यांना स्थानिक लोकप्रतिनिधींनी लेखी निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-१०-२०१८) :** (१) होय,

(२) व (३) उक्त निवेदन पुढील कार्यवाहीस्तव पाठविण्यात आले आहे. स्थानिक लोकप्रतिनिधींच्या उक्त निवेदनात २० रस्त्यांच्या कामांची मागणी करण्यात आली होती. यापैकी ७ कामांना प्रशासकीय मंजूरी प्राप्त झाली असून, त्यापैकी जिथे भिवंडी - निजामपूर महानगरपालिकेतर्फे मल:निस्सारण वाहिन्या टाकण्याचे काम जवळपास पूर्ण झाले आहे. अशा २ रस्त्यांची निविदा प्रक्रीया सुरु आहे. उर्वरित ५ रस्त्यांची कामे भिवंडी महानगरपालिकेमार्फत मल:निस्सारण वाहिन्यांची कामे पूर्ण झाल्यानंतर हाती घेण्याचे प्रस्तावित आहे. उर्वरित १३ रस्त्यांचे प्रस्ताव प्राधिकरणाच्या स्तरावर तपासण्यात येत आहेत.

---

### विलेपार्ले पूर्व (मुंबई) येथील अमोघ एस.आर.ए. प्रकल्पातील गैरव्यवहाराबाबत

**(३३) ११६९१५ (२१-०६-२०१८). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विलेपार्ले पूर्व (मुंबई) येथील शिवाजी नगर येथे झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यासाठी आवश्यक संख्याबळ नसल्यामुळे बोगस झोपडपट्टीधारकांची नोंदणी केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अमोघ एस. आर. ए. प्रकल्पात विकासकाने गैरमार्गाचा अवलंब करून मूळ नकाशातही फेरफार केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या पुनर्वसन प्रकल्पात १६ पी. ए. पी. गाळे दाखविण्यात आले असून सदर गाळे विक्री घटकाच्या इमारतीत विक्री केल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीनुसार दोषी विकासकावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (०९-०७-२०१८) :** (१) हे खरे नाही. मौ. विलेपार्ले, ता. अंधेरी, न.भू.क्र. ४१०, ४१०/१ ते ८ या मिळकतीवरील अमोघ सहा.गृह. संस्थेचे परिशिष्ट-२ अपर जिल्हाधिकारी (अति/निष्का), पश्चिम उपनगरे कार्यालयाकडून दि. ३१.०१.२००२ रोजी निर्गमित करण्यात आली असून, सदर परिशिष्ट-२ मध्ये एकूण २५ झोपडीधारकांचा समावेश आहे.

(२) हे खरे नाही. प्रश्नांकित संस्थेचे सुधारित परिशिष्ट-२ सचिव, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांचेद्वारे पारित करण्यात आले असून परिशिष्ट-२ मधील बंद दर्शविण्यात आलेल्या ६ झोपडीधारक व नव्याने समाविष्टकरण्यात आलेले १० झोपडीधारक असे एकूण १६ झोपडीधारकांचे स्थळ पहाणी अंती सुधारित परिशिष्ट-२ व सुधारित नकाशा दि. २८.०५.२००२ पारित करण्यात आला असल्याचा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचा अहवाल आहे.

(३) सदर योजनेमध्ये प्रकल्पबाधित गाळे नसल्याचा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचा अहवाल आहे.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ठाणे महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये मागील ८ वर्षामध्ये ९० हजार नागरीकांना श्वानदंश झाल्याबाबत**

**(३४) ११७०३२ (२७-०७-२०१८). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये मागील ८ वर्षामध्ये ९० हजार नागरीकांना श्वानदंश झाल्याची बाब माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान महानगरपालिकेच्या अहवालातुन निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ठाणे जिल्हयात भटक्या कुत्र्यांनी गत वर्षी सुमारे २ हजार ८५९ व्यक्तींना चावा घेतल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ठाणे महानगरपालिकेंतर्गत कुत्र्यांच्या निर्बिजीकरणात गैरव्यवहार झाल्याचे ठाण्यातील नागरिकांनी महानगरपालिकेवर आरोप केलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी निर्बिजीकरण कामाचे नियोजन करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने जबाबदारी निश्चित केली आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-१०-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सन २०११ - १२ मध्ये जिल्हा रुग्णालय, ठाणे येथे २८०० उपजिल्हा रुग्णालय, शहापुर येथे ८६४ व ग्रामीण रुग्णालय, बदलापुर येथे ९६९ एवढ्या श्वानदंश रुग्णांनी औषधोपचार घेतलेला आहे व सन २०१७-१८ मध्ये जिल्हा रुग्णालय, ठाणे येथे ३१०६ उपजिल्हा रुग्णालय, शहापुर येथे ९१२ व ग्रामीण रुग्णालय, बदलापुर येथे १०९८ एवढ्या श्वानदंश रुग्णांनी औषधोपचार घेतलेला आहे.
(३) व (४) ठाणे महानगरपालिका यांनी श्वान दंशापासून नागरीकांचे रक्षण व्हावे याकरीता खालील उपाययोजना केली आहे:-
• केंद्र शासनाच्या पशुजन्य नियंत्रण (कुत्रे) नियम २००१ अन्वये भटक्या कुत्र्यांच्या प्रजनन प्रतिबंधक शस्त्रक्रिया व रेबीज प्रतिबंधक लस देण्याच्या कार्यक्रमाची सन २००४ पासून अंमलबजावणी करण्यात येत आहे. आजतागायत ५८५३७ भटक्या कुत्र्यांवर शस्त्रक्रिया करण्यात आलेल्या आहेत व रेबीज लस देण्यात आलेल्या आहेत.
• ठाणे महानगरपालिकेच्या आरोग्य केंद्र व छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय येथे ॲन्टी रेबीज लस तसेच इमोनोग्लोबिलीन लस उपलब्ध करण्यात आलेली असून सर्व श्वानदंश रुग्णांना ॲन्टी रेबीज लस देण्यात येतात.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई, नाशिक, पुण्यासह राज्यातील प्रमुख शहरांतील सन २०११ पर्यंतच्या झोपड्यांना कायदेशीर मान्यता देण्याबाबत**

**(३५) ११७०५९ (२३-०७-२०१८). श्री.नारायण पाटील (करमाळा), श्री.अनिल कदम (निफाड), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई, नाशिक, पुण्यासह राज्यातील प्रमुख शहरांतील सन २०११ पर्यंतच्या झोपड्यांना कायदेशीर मान्यता देण्याचा तसेच झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत संबंधित लाभार्थींना ४०० चौ.फुटाचे घर देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त विचाराधीन प्रस्तावाच्या अनुषंगाने निर्णय घेण्यात आला आहे काय,

(३) असल्यास, निर्णयाच्या अनुषंगाने कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. प्रकाश महेता (२९-०८-२०१८) :** (१), (२) व (३) महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु. नि. व पु.) अधिनियम १९७१ मध्ये सुधारणा करणारे विधेयक हिवाळी अधिवेशन २०१७ मध्ये पारित करण्यात आले. त्याअनुषंगाने मा.राष्ट्रपती महोदयांच्या मान्यतेने सदर अधिनियमान्वये सुधारणा करण्यासंबधीची अधिसूचना दि. २६.०४.२०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर अधिनियमातील तरतूदीनुसार दि.०१.०१.२०११ अथवा त्यापूर्वी पासूनची झोपडी सशुल्क पुनर्वसन योग्य असल्याचे ठरविण्याबाबत तसेच त्यात प्रत्यक्ष राहणाऱ्या झोपडीवासीयाचा निवारा निश्चित करण्याबाबत अटी व शर्ती नमूद करणारा शासन निर्णय दि. १६.०५.२०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आला आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली झोपडपट्टीधारकांना अधिक आकारमानाची घरे देण्याच्या अनुषंगाने त्याचा मंजूर तथा चालू झोपडपट्टी पुनर्वसन योजनांवर होणारा परिणाम अभ्यासण्यासाठी दि.१०.१.२०१८ रोजी समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीचा अहवाल लवकरच अपेक्षित आहे.

---

**मुंबईतील संसद सदस्य व आमदार यांच्या निधीतून झोपडपट्टी सुधार मंडळामार्फत कामे न करताच देयके काढण्यात येत असल्याबाबत**

**(३६) ११७२१८ (२३-०७-२०१८). श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अब्दुल सत्तार**

**(सिल्लोड), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.जयकुमार गोरे (माण), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.सुनिल केदार (सावनेर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.भाऊसाहेब पाटील - चिकटगांवकर (वैजापूर), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.संजय कदम (दापोली), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.दिपक चव्हाण (फलटण), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील संसद सदस्य व विधानसभा सदस्य यांच्या निधीतून कोटयावधी रुपयांची कामे म्हाडाच्या अखत्यारित येणाऱ्या झोपडपट्टी सुधार मंडळामार्फत केली जात असली तरी कामे न करताच देयकांना मंजुरी मिळत असल्याबाबतच्या तक्रारी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे दिनांक १६ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास प्राप्त झाल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विविध लोकोपयोगी कामांसाठी म्हाडाच्या झोपडपट्टी सुधार मंडळाकडे दरवर्षी ३०० ते ४०० कोटी रुपयांचा निधी जिल्हाधिका-यांमार्फत येतो यापैकी किमान ६२% टक्के रक्कम संबंधित अधिकारी हडप करीत असल्याचे निदशर्नास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानूसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (१२-१०-२०१८) :** (१), (२) व (३) मुख्य अधिकारी, झोपडपट्टी सुधार मंडळाच्या अहवालानुसार मा.खासदार, मा.आमदार यांच्या तसेच सौंदर्यीकरण, नागरी दलित वस्ती सुधार योजना व इतर निधीतून कार्यान्वयीन यंत्रणा म्हणून म्हाडाच्या मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळामार्फत विविध प्रकारची कामे करण्यात येतात. या कामांबाबत, कामे न करताच देयके अदा केली जातात अशा प्रकारची तक्रार झोपडपट्टी सुधार मंडळाकडे प्राप्त झालेली नाही. परंतु, दि.१६.४.२०१८ रोजीच्या वर्तमान पत्रात अशाप्रकारची बातमी आलेली आहे. तथापि या बातमीत देखील तथ्य आढळून आलेले नसून, विविध लोकप्रतिनिधींनी सुचविलेली कामे प्रत्यक्षात पुर्ण केल्यानंतरच देयक अदा करण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ठाणे शहरात असलेले मध्यवर्ती कारागृह अन्य ठिकाणी स्थलांतरित करण्याबाबत**

**(३७) ११७५९० (२३-०७-२०१८). श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे शहरात मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या मध्यवर्ती कारागृह अन्य ठिकाणी स्थालंतरित करुन त्याठिकाणी पर्यटन स्थळ विकसित करण्याचा प्रस्ताव ठाणे महानगरपालिकेच्या महासभेने संमत केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, असा निर्णय घेण्याची कारणे काय आहेत व सदर प्रस्ताव अंतिम मान्यतेसाठी शासनाला प्राप्त झाला आहे काय, असल्यास, केव्हा,

(३) असल्यास, ठाणे मध्यवर्ती कारागृहाचे स्थलांतर निश्चित कोणत्या ठिकाणी करण्यात येणार आहे,

(४) असल्यास, मध्यवर्ती कारागृहाच्या जागेत विकसित करण्यात येणाऱ्या पर्यटन स्थळाचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे व त्याठिकाणी पर्यटनाच्यादृष्टीने कोणत्या सोईसुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-१०-२०१८) :** (१) ठाणे महानगरपालिका हद्दीतील मध्यवर्ती कारागृहाच्या वास्तूचे जतन व संवर्धन होऊन ठाण्याचा इतिहास ठाणेकरांसाठी जिवंत करण्याकरीता उक्त ठिकाणी ऐतिहासिक पर्यटन केंद्र तयार करुन, स्वातंत्र्य सैनिकांचे आणि देशासाठी बलिदान देणाऱ्या शहिदांचे या ठिकाणी स्मारक करुन सर्वसामान्यांसाठी खुले करावे असा ठराव ठाणे महानगरपालिकेच्या महासभेने दिनांक २८.०२.२०१८ रोजी पारीत केला आहे.

(२) व (३) सदर प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला नसल्याचे ठाणे महानगरपालिकने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चिखली व खामगांव (जि.बुलढाणा) नगरपरिषदेकरिता वैशिष्टपूर्ण योजनेंतर्गत विकास कामांकरिता वितरीत झालेल्या निधीबाबत**

**(३८) ११९४०८ (२८-०७-२०१८). श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिखली व खामगांव (जि.बुलढाणा) नगरपरिषदेकरिता वैशिष्टपूर्ण योजनेअंतर्गत विकास कामांकरिता सन २०१४-१५ पासून वितरीत झालेल्या निधीची तपशीलवार माहिती देण्याबाबत मा.स्थानिक लोकप्रतिनिधींना प्रधान सचिव, नगरविकास यांना दिनांक ६ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास लेखी पत्र दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मोठा कालावधी उलटूनही मा.स्थानिक लोकप्रतिनिधींनी अदयाप माहिती देण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन सदर माहिती स्थानिक लोकप्रतिधींना त्वरीत उपलब्ध करुन देण्यासह माहिती देण्यास टाळाटाळ करणा-या संबधित अधिका-यांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-१०-२०१८) :** (१), (२) व (३) • चिखली नगरपरिषद व खामगाव नगरपरिषदेस शासन निर्णय दि.२५/०८/२०१४ अन्वये रु.२.०१ कोटी मंजूर करण्यात आले होते व यापैकी रु.१.२०६ कोटी (६०%) निधी प्रत्यक्ष वितरीत करण्यात आला होता.

• सदर नगरपरिषदांचा उर्वरीत रु.०.८०४ कोटी निधी(४०%) वितरीत करण्याबाबत जिल्हाधिकारी, बुलढाणा यांनी दि.२७/०५/२०१५ अन्वये शासनास विनंती केली होती.

• जिल्हाधिकारी, बुलढाणा यांच्या विनंतीच अनुषंगाने किती निधी वितरीत केला याची माहीती देण्याचे निवेदन शासनास दि.०६/०९/२०१६ रोजी प्राप्त झाले होते.

• प्रस्तुत प्रकरणी संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्था यांनी कामे गुणवत्तेनुसार पुर्ण झाल्याची खातरजमा करुन उर्वरीत निधी (४०%) स्वत: भरणे आवश्यक आहे. त्यामुळे शासनस्तरावरुन उर्वरीत निधी उपलब्ध करुन देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मरोळ प्रसूतिगृहात (मुंबई) रुग्णांना औषधाच्या दुकानाचे नाव, पत्ता आणि मोबाईल क्रमांक नमूद केलेल्या कागदावरच औषधे लिहून देण्यात येत असल्याबाबत

**(३९) ११९९०० (२८-०७-२०१८). श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगरपालिकेच्या मरोळ प्रसूतिगृहात रुग्णांना औषधाच्या दुकानाचे नाव, पत्ता आणि मोबाईल क्रमांक नमूद केलेल्या कागदावरच औषधे लिहून ती रुग्णांच्या नातेवाईकांना आणण्यास सांगितले जात असल्याची बाब माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महानगरपालिका रुग्णालयात नाममात्र शुल्क घेऊन उपचार केले जातात तसेच औषधही विनामूल्य दिले जात असतानाही महानगरपालिकेच्या या प्रसूतीगृहात रुग्ण व रुग्णांचे नातेवाईकांचे हाल होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी करून औषध दुकानांची मक्तेदारी बंद करून संबंधित डॉक्टर व औषध दुकानदार यांच्यावर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-१०-२०१८) :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मरोळ प्रसुतीगृहात औषधांचा साठा मुबलक असल्याने कोणत्याही प्रकारची औषधे रुग्णांना बाहेरुन खरेदी करण्यास सांगितले जात नाहीत.

तसेच, मरोळ प्रसुतीगृहात औषध निरीक्षकांनी अचानक दिलेल्या भेटीमध्ये कोणत्याही औषध दुकानाचे प्रष्ठप्रत मिळाले नसल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सिडको प्राधिकरणाने साडेबारा टक्के योजनेअंतर्गत द्रोणागिरी येथे दिलेले भूखंड बदलून देण्याबाबत**

**(४०) १२०२९८ (०७-०७-२०१८). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिडको प्राधिकरणाने विकासकामाच्या नावाखाली शेतक-यांच्या जमिनी संपादीत करताना साडेबारा टक्के योजनेअंतर्गत द्रोणागिरी येथे अविकसीत ठिकाणी दिलेल्या २६० भूखंडाचा अद्यापपर्यंत विकास होवू शकला नसल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिडको प्रशासनाने प्रत्यक्षात जागेची पहाणी न करता प्रकल्पग्रस्तांना वाटप करण्यात आलेल्या २६० भूखंडांवर खारपुटी असल्याने भूखंडाचा विकास होवू शकला नाही तसेच काही भूखंड अशा ठिकाणी देण्यात आले आहे त्याठिकाणी रस्ते, वीज व पाण्याची सोय नसल्यामुळे विकास करणे अडचणीचे होत असून सदर भूखंड बदलून द्यावे अशी मागणी प्रकल्पग्रस्तांनी सिडको प्रशासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून प्रकल्पग्रस्तांना साडेबारा टक्के योजनेतून द्रोणागिरी येथे वाटप केलेले भूखंड तातडीने बदलून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०७-२०१८) :** (१), (२) व (३) द्रोणागिरी सेक्टर ४४ व ६२ येथे, तसेच धारण तलावालगतच्या रस्त्यांवर असलेल्या २६० भुखंडांच्या विकासास चाणजे ग्रुप ग्रामपंचायत स्थानिक प्रकल्पग्रस्त कृती समिती व इतर स्थानिकांनी तीव्र विरोध दर्शविला असून त्याबदल्यात गरजेपोटी बांधलेली बांधकामे नियमित करणे, एस. ई. झेड. रद्द करणे, गावठाण विस्तार करणे, असंपादित जमीन वगळणे इ. नियमबाह्य मागण्या केल्या असल्याने या ठिकाणची पायाभुत विकास कामे करणे शक्य झाले नाही.

तसेच द्रोणागिरी नोड येथे भरतीचे पाणी गाव परिसरात शिरू नये याकरिता धारण तलावांची निर्मिती केली असून त्याठिकाणी एफ. आर. पी. झडपा बसविल्यामुळे भरतीचे पाणी आत येत नाही. तथापि मच्छीमारांकडून मासेमारीसाठी वेळोवेळी या झडपा तोडण्यात येत असल्यामुळे भरतीचे पाणी आत येऊ लागले. परिणामी त्याठिकाणी कांदळवनांची वाढ झाली असून वन कायदा व मा. उच्च न्यायालयाने सन २००५ मध्ये कांदळवनांच्या ५० मी. परिघात विकासकामे करण्यास मनाई केली आहे.

द्रोणागिरी नोडमधील खारफुटीपासून ५० मी. च्या बफर झोनमध्ये विकास कामे करण्यासाठी पर्यावरण मंत्रालय व मा. उच्च न्यायालयाची परवानगी घेण्याची कार्यवाही सिडकोमार्फत सुरू असून त्यानंतर भुखंड बदलून न देता विकास कामे करण्यात येणार आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वसई-विरारमधील(जि.पालघर) एकमेव पापडखिंड धरण कायमस्वरुपी बंद करण्याबाबत**

**(४१) १२०३४९ (२९-०७-२०१८). श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसई-विरारमधील (जि.पालघर) एकमेव पापडखिंड धरण प्रदूषित असल्याने ते कायमस्वरुपी बंद करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, असल्यास, सदर धरणाजवळून बुलेट ट्रेनचा मार्ग जाणार असल्याने हा निर्णय घेण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पापडखिंड धरण बंद केल्याने तेथील नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी त्रास सहन करावा लागणार असल्याने नागरिकांनी तीव्र विरोध केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, त्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-१०-२०१८) :** (१) वसई-विरार (जि.पालघर) येथील पापडखिंड धरण प्रदूषित झाल्या कारणास्तव बंद करण्याचा निर्णय घेतला नसल्याचे वसई-विरार शहर महानगरपालिकेने कळविले आहे.
(२) नाही.
(३) पापडखिंड धरणातून माहे जुलै ते फेब्रुवारीपर्यंत १ द.ल.लि. प्रतीदिन पाणी पुरवठा करण्यात येतो.
यावर्षी दिनांक २६.०६.२०१८ पासून वसई-विरार शहर महानगरपालिकेने उक्त धरणातून पाणीपुरवठा सुरू केला आहे.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नाशिक महानगरपालिकेच्या बांधीव मिळकती व खुल्या जागा वाटपाच्या धोरण निश्चीतीबाबत**

**(४२) १२०६६२ (२३-०७-२०१८). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक महानगरपालिकेच्या बांधीव मिळकती व खुल्या जागा वाटपाच्या धोरण निश्चीतीबाबत महानगरपालिकेच्या वतीने नामनपा/आस्विस/७७/२०१६ दिनांक ९ जून, २०१६ रोजी वा तया सुमारास प्रस्ताव शासनास सादर केलेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहु प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-१०-२०१८) :** (१) होय.
(२) सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भिवंडी-निजामपूर (जि.ठाणे) महानगरपालिका हद्दीतील तीनबत्ती कोटरगेट येथील सर्वे नं. ९२९ मधील जागा मार्केटसाठी संपादित केल्याबाबत**

**(४३) १२१२८९ (२९-०७-२०१८). श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिवंडी-निजामपूर (जि.ठाणे) महानगरपालिका हद्दीतील तीनबत्ती कोटरगेट येथील सर्व्हे नं. ९२९ मधील जागा मार्केटसाठी सन १९९५ मध्ये संपादित केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महानगरपालिकेने सन १९९९ मध्ये २० रुपयांच्या स्टँप पेपरवर त्यांना दुकान देण्याचे लिहून दिले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अद्याप दुकान अथवा मोबदला न देण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-१०-२०१८) :** (१), (२) व (३) हे खरे आहे.
भिवंडी-निजामपूर (जि.ठाणे) महानगरपालिका हद्दीतील तीनबत्ती कोटरगेट येथील मार्केटसाठी जागा संपादित करण्याबाबत भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिकेने खालील प्रमाणे कळविले आहे:-
• भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिका हद्दीतील मौजे भिवंडी सि.स. ९२६ ते ९३१ आरक्षण क्र.११ (जूने-५४) खालील जागा भुसंपादन अधिनियम, १८९४ अन्वये १९९८ मध्ये संपादीत करण्यात आली आहे.
• तत्कालीन भिवंडी-निजामपूर नगरपरिषदेस दिनांक १०.१२.१९९८ रोजी जागेचा ताबा मिळाला आहे.
• दिनांक ११.१२.१९९८ रोजी आरक्षण क्र.११ (जूने-५४) लगतच्या विकास योजना रस्त्यावरील १२५ अतिक्रमणधारक, १४ भाडेकरूंसह यांना तत्कालीन नगरपरिषदेने मार्केटच बांधकाम पूर्ण झाल्यानंतर नियमानुसार भाडे आकारून गाळा देण्यात येईल असे रक्कम रु.२० च्या मुद्रांक पत्रावर करार केला आहे, ही वस्तुस्थिती आहे.
• उक्त जागेत अद्यापही मार्केट बांधण्यात आलेले नाही.

---

**ठाणे, पालघर जिल्हयातील महापालिकांच्या क्षेत्रात अनधिकृत बांधकामांबाबत उच्चस्तरीय समिती स्थापन करण्याबाबत**

**(४४) १२२०७४ (२९-०७-२०१८). श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हरित वसई संस्थेने सन २००७ मध्ये दाखल केलेल्या याचिकेवरील सुणावणीप्रसंगी दिनंक २८ जानेवारी, २००९ रोजी ठाणे व पालघर जिल्हयातील महापालिकांच्या क्षेत्रात अनधिकृत बांधकामांच्या गंभीर प्रश्नावर न्यायालयाने उच्चस्तरीय समिती स्थापन करण्याचे आदेश दिल्यानंतर माहे मार्च, २००९ मध्ये वा त्या दरम्यान मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली १४ सदस्यीय समिती स्थापन करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या समितीने ठाणे व पालघर जिल्हयातील अनधिकृत बांधकामे व अनुषंगिक प्रश्नांचा सखोल अभ्यास करुन कार्यवाहीचा अहवाल वेळोवेळी न्यायालयाला सादर केला होता, हे ही खरे आहे काय.

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्याअनुषंगाने वाढत्या अनधिकृत बांधकामांना तात्काळ आळा घालण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-१०-२०१८) :** (१) व (२) होय.

(३) सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालयाने राज्य शासन तसेच ठाणे व पालघर जिल्हयातील महानगरपालिका यांना सूचना केल्यानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

तद्नुषंगाने ठाणे, मिरा-भाईंदर, नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकाम / अतिक्रमण नियंत्रण व निर्मुलन याकरीता पोलीस दलातील विविध संवर्गातील पदे निर्माण करण्यात आली आहेत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २६७ अंतर्गत अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्याकरीता प्रभाग निहाय पदनिर्देशित अधिकारी घोषित करण्यात आले आहेत.

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील अतिक्रमण व अनधिकृत बांधकामासंदर्भातील प्रकरणे चालविण्यासाठी विशेष न्यायालय कार्यरत आहेत.

जनहित याचिका क्र. ३५/२००७, ३६/२००७, २५/२०१० तसेच रिट याचिका क्र. ३१०४/२०१३ अंतर्गत मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे शहरात व उपनगरातील महानगरपालिकेने आरक्षित केलेल्या जागा अनधिकृतरित्या हस्तगत करण्यात आल्याबाबत**

**(४५) १२२९६० (२९-०७-२०१८). श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरात व उपनगरातील महानगरपालिकेने आरक्षित केलेल्या जागांवर कामाचे साहित्याचे गोदामे, कामगारांना राहण्यासाठी झोपडपट्ट्या, कार्यालय उभारून महानगरपालिका ठेकेदार व व्यावसायिकांनी या जागांवर कब्जा केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शहरातील उपनगरामधे व शिवाजीनगर मतदार संघातील अनेक आरक्षित जागा व पदपथावर पुणे महानगरपालिकेच्या ठेकेदारांनी केलेल्या बेकायदेशीर ताब्याबाबत भूमी जिंदगी विभागामार्फत कार्यवाही करण्यास टाळाटाळ केली जात असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर कोट्यवधी रुपयांची जागा ठेकेदार व व्यवसायिकांच्या अतिक्रमणापासून मुक्त करणेबाबत शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-१०-२०१८) :** (१), (२) व (३) पथ विभागाकडून निविदा मार्फत करण्यात येणाऱ्या मोठ्या स्वरुपाच्या कामासाठी ठेकेदार तात्पुरत्या स्वरुपात साईट कार्यालयासाठी व इतर बाबीसाठी पदपथ वा रस्त्याच्या कडेचा काही भाग वापरतात व काम पूर्ण झाल्यानंतर काढून टाकतात. सद्यस्थितीत पथ विभागामार्फत ठेकेदारांनी काम पुर्ण झाल्यानंतर कार्यालये, गोदामे इ. साठीची मनपाच्या जागेवर कब्जा केल्याचे निदर्शनास येत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**केंद्र शासनाच्या पंतप्रधान आवास योजनेंतर्गत २५ लाख कुटुंबांनी घराची मागणी केल्याबाबत**

**(४६) १२३२०२ (२३-०७-२०१८). श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र शासनाच्या प्रत्येकाला घर या महत्वाकांक्षी पंतप्रधान आवास योजनेंतर्गत राज्यभरातून २५ लाख कुटुंबांनी घराची मागणी केली असल्याची बाब माहे एप्रिल, २०१८ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या योजनेसाठी खाजगी विकासकाकडून मुंबई महानगर क्षेत्रात एक लाख घरे बांधण्याचे प्रस्ताव म्हाडाला प्राप्त झाले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या योजनेंतर्गत २ लाख २७ हजार घरांच्या प्रस्तावाला केंद्र शासनाने मान्यता दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सन २०२२ पर्यंत १९ लाख घरे बांधण्याचे उद्दिष्ट राज्यात ठेवण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (१९-१०-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

केंद्र शासनाच्या PMAY-MIS पोर्टलवरील माहितीनुसार दि.३.८.२०१८ पर्यंत प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) मध्ये चारही घटकांतर्गत राज्यातील एकूण २५,२९,४२८ कुटुंबांनी मागणीची नोंदणी (Demand Servey) केलेली आहे.

(२) हे खरे नाही.

खाजगी विकासकाकडून मुंबई महानगर क्षेत्रातंर्गत खालील प्रमाणे घरकुलांचे प्रस्ताव प्राप्त झाले असून , सदरहू प्रस्तावास केंद्रीय मान्यता व संनियंत्रण समितीने तत्वत: मान्यता दिलेली आहे. सदर अंमलबजावणी यंत्रणेकडून प्रकल्पांचे सविस्तर अहवाल तयार करुन मंजुरीसाठी पाठवण्याबाबतची कार्यवाही चालू आहे.

| अ.क्र. | ठिकाण | घरकुलांची संख्या |
|---|---|---|
| १ | बदलापूर | ४२०० |
| २ | डहाणू | ८०० |
| ३ | खरोशी, पेण | ७००० |
| ४ | खोपोली | १२०० |
| ५ | कांदिवली | ५०४ |
| | **एकूण** | **१३७०४** |

(३) दि.२३/८/२०१८ पर्यंत केंद्रीय मान्यता व संनियंत्रण समितीने राज्यातील एकूण २७३ प्रकल्पांमध्ये ६,७१,६२२ (५,४८,१८८ EWS) घरकुलांना मान्यता दिलेली आहे.

(४) हे खरे आहे.

(५) प्रधानमंत्री आवास योजनेची राज्यात प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी व योजनेला गती देण्यासाठी राज्य शासनाने खालील सवलती व उपाययोजना केलेल्या आहेत.

अ) शासकीय जमिनी रु.१ /-प्रती चौ.मी. या नाममात्र दराने शासकीय संस्थांना वितरीत करण्यासाठी दि.१९.०९.२०१६ रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे.

ब) मोजणी शुल्कात ५०% सवलतीबाबत आदेश निर्गमित केले आहेत.

क) आर्थिक दृष्टया दुर्बल घटक तसेच अल्प उत्पन्न गटातील लाभार्थ्यांना वाटप करण्यात येणाऱ्या ३० ते ६० चौ.मी. क्षेत्राच्या सदनिकेसाठी केवळ पहिल्या दस्ताला रु.१००० इतके मुद्रांक शुल्क आकारण्याची अधिसूचना निर्गमित केली आहे.

ड) विकास शुल्कामध्ये सवलत देण्याबाबत मंत्रिमंडळाने निर्णय घेतला आहे.

इ) सार्वजनिक खाजगी भागीदारी (PPP) तत्वानुसार जमिनीवर खाजगी विकासकाच्या सहभागातून परवडणाऱ्या घरांची निर्मिती करण्यासाठी दि.११.०१.२०१८ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जोहर नगर (बुलढाणा शहर) नगरपालिकेच्या दवाखान्यात औषधांचा निर्माण झालेला तुटवडा**

**(४७) १२३३२२ (२९-०७-२०१८). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा शहरातील जोहर नगरातील नगरपालिकेच्या दवाखान्यात औषधांचा मुबलक साठा नसल्याने औषधांचा पुरवठा तातडीने करण्याबाबत दिनांक ७ मे, २०१८ रोजी वा त्या सुमारास दवाखान्यासमोर आंदोलन केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या दवाखान्यात औषधांचा साठा नसण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, या दवाखान्यात तातडीने औषधांचा पुरवठा करण्याबाबत शासन कोणती कार्यवाही करणार वा करित आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-१०-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) • बुलढाणा शहरातील जोहर नगरातील रुग्णालयाचे हस्तांतरण हे नगरपरिषदेला माहे डिसेंबर, २०१७ मध्ये आरोग्य विभाग, जिल्हा परिषदेकडून करण्यात आले आहे.

• तसेच औषध वितरणासंबंधी असणारे पद (फार्मासिस्ट) औषध निर्माता हे पद कंत्राटी स्वरुपात मंजूर असून सदर पद दिनांक ३० जुलै, २०१८ पर्यंत रिक्त होते. त्यामुळे औषधसाठा व मागणी होऊ शकली नाही.

• सदर पदावर दिनांक ३१/७/२०१८ रोजी कंत्राटी औषध निर्माता हे रुजू झाले आहेत.

(३) औषधाच्या मागणीबाबत नगरपालिकेने जिल्हा शल्य चिकित्सक यांच्या स्तरावर औषधी खरेदी ई-निविदांचे दरपत्रक मागवून मंजूर असलेल्या फर्मकडून औषधसाठा पुरविण्याबाबत पुरवठा आदेश दिनांक १७ सप्टेंबर, २०१८ रोजी देण्यात आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुक्ताईनगर, भूसावळ व बोदवड (जि.जळगांव) नगरपरिषदेस नवीन प्रशासकीय इमारतीच्या बांधकामासाठी निधी मंजूर करण्याबाबत**

**(४८) १२४०६५ (२६-०७-२०१८). श्री.एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव जिल्ह्यातील मुक्ताईनगर, भूसावळ व बोदवड नगरपरिषदेस नवीन प्रशासकीय इमारतीच्या बांधकामासाठी निधी मंजूर करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी दिनांक ९ मार्च, २०१८ व २८ मे, २०१८ रोजी वा त्या सुमारास निवेदनाव्दारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी किती निधी मंजूर करण्यात आला आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-१०-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) • राज्य शासनाच्या "नव्याने स्थापन केलेल्या नगरपंचायतीना नागरी सुविधा पुरविण्यासाठी सहाय्य" या योजनेअंतर्गत सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात मुक्ताईनगर व बोदवड नगरपंचायत यांना अनुक्रमे रु.५.०० कोटी व रु.२.०० कोटी निधी वितरीत करण्यात आला आहे.

• भुसावळ नगरपरिषदेला निधी वितरणासंदर्भात आर्थिक वर्ष सन २०१८-१९ मध्ये निधी वितरणाच्या वेळी विचार करण्यात येईल.

---

**सावदा नगरपालिका (जि.जळगांव) संचलित श्री.आ.गं.हायस्कुल व श्री.ना.गो.पाटील कनिष्ठ महाविद्यालय या शाळांसाठी विशेष निधी मंजूर करणेबाबत**

**(४९) १२४५३५ (३०-०७-२०१८). श्री.एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावदा नगरपालिका (जि.जळगांव) संचलित श्री.आ.गं.हायस्कुल व श्री.ना.गो.पाटील कनिष्ठ महाविद्यालय या शाळेच्या स्थापनेस १०० वर्ष पुर्ण होत असल्याने शताब्दी वर्ष साजरे करण्याच्या निमित्ताने सदर शाळेत वाचनालय, अद्ययावत प्रयोग शाळा इत्यादी कामांसाठी सुमारे २५० लक्ष खर्च अपेक्षित असून सदर खर्च नगरपालिका निधी मधुन शक्य नसल्याने शासनामार्फत विशेष निधी नगरपरिषदेस मंजूर करण्याबाबत मागणी तेथील लोकप्रतिनिधींनी दिनांक ६ मार्च, २०१८ रोजी वा त्या सुमारास निवेदनाव्दारे मा.मुख्यमंत्री यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-१०-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे. सदर निवेदन दिनांक २ एप्रिल,२०१८ रोजी या विभागास प्राप्त झालेले आहे.

(२) वित्तीय वर्ष सन २०१८-१९ च्या अनुदान वितरण करताना याबाबतचा उचित निर्णय करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कणकवली शहरात (ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग) मे.निर्माण रियलेटर्स कंपनीने राष्ट्रीय महामार्गालगत अग्निशामक विभागाकडून नाहरकत दाखला न घेता केलेले बांधकाम**

**(५०) १२६३४८ (२९-०७-२०१८). श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कणकवली शहरात (ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग) राष्ट्रीय महामार्गालगत सिटी सर्व्हे नंबर १६०१ मध्ये मे.निर्माण रियलेटर्स कंपनीने रस्त्याच्या मध्यबिंदूपासून ३७ मीटरच्या आत निवासी व वाणिज्य प्रकारचे बांधकाम करून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दिनांक ९ मार्च,

२००१ च्या शासन निर्णयातील अटी शर्तीचा व पथकिनारवर्ती नियमांचा भंग केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एखाद्या इमारतीमध्ये वाणिज्य प्रकारचे एकूण बांधकाम हे ५०० चौ.मी. पेक्षा जास्त असेल तर नगरपालिका विकास नियंत्रण नियमावलीचे कलम ६.६.२ नुसार नियम क्रमांक ६.२.६.१ अन्वये मान्य होऊ शकणाऱ्या बांधकाम प्रस्तावासाठी मुख्य अग्निशामक अधिकारी यांनी तो प्रस्ताव तपासला पाहिजे व त्यांनी ना-हरकतपत्र दिल्यानंतर मुख्याधिकारी यांनी इमारत परवाना द्यावयाचा असताना संबंधित विकासकाने एकूण ६३५.६५ चौ.मी. वाणिज्य प्रकारचे बांधकाम करून देखील अग्निशामक विभागाकडून नाहरकत दाखला किंवा पूर्वपरवानगी घेतलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित विकासकाने मुख्य अग्निशामक अधिकारी यांचेकडून नाहरकत पत्र प्राप्त केलेले नसल्यामुळे नगरपालिका विकास नियंत्रण नियमावलीचे कलम ६.६.२ नुसार मुख्याधिकारी कणकवली यांनी दिलेली परवानगी ही नियमबाहय ठरते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, संबंधित विकासकाने केलेले अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्यासंदर्भात श्री.प्रशांत एकनाथ लाड यांनी जून २०१८ मध्ये जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग यांचेकडे तक्रार केली होती, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीची सद्यस्थिती काय आहे, नसल्यास, विलंबची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-१०-२०१८) :** (१) कणकवली सिटी सर्व्हे नं. १६०१ मध्ये झालेले इमारत बांधकाम हे विशेष इमारत प्रकारात मोडत नसून मिश्र स्वरुपाच्या इमारत प्रकारात असल्याने पथकिनारवरर्ती नियमांचा भंग झालेला नाही, असे जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांच्या अहवालात नमूद केले आहे.

(२) व (३) नगरपालिका विकास नियंत्रण निमावली कलम, ६.६.२ ही विशेष इमारतीकरीता लागू होत असून उक्त प्रकरणातील इमारत मिश्र स्वरुपाची असल्याने मुख्याधिकारी यांनी सदर प्रकरणी बांधकाम परवानगी दिली असल्याचे जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांच्या अहवालानुसार निदर्शनास येते.

(४) व (५) अशा आशयाची तक्रार जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांच्याकडे प्राप्त झाली आहे, हे खरे आहे. सदर प्रकरणी झालेले बांधकाम विहित नियम व शासनाच्या प्रचलित तांत्रिक अटी व शर्ती यांच्या अधिन राहून केल्याचे खातरजमा करुन नियमानुसार कार्यवाही करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांना देण्यात आल्या आहेत.

---

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**

**मुंबई.** **प्रधान सचिव,**

**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.